# श्री साईलीला



मे १९६६ ★ किं. ५० पैसे

स्थापना - १९१६



साईबाबांच्या मूर्ती,

पूजेचीं भांडीं

व

चांदीचे

सोन्याचे

मोत्यांचे

सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू
सुप्रसिद्ध पेढी

## ई. आर. मालपेकर.

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २ टे. नं. ३५५७३१



## श्री साई वाक्सुधा

अहंकाराची राखरांगोळी व्हावी लागते. लोभाचें निर्मूलन व्हावें लागतें. मनांत कसलीही इच्छा आकांक्षा नसावी. या पायरीपर्यंत जेव्हां आपण येऊन पोंहोंचतों तेव्हांच ब्रह्मप्राप्तीचा मार्ग मोकळा होऊं शकतो. आसक्ति हेंच बंधनाचें प्रमुख कारण आहे. विषयाची कल्पनाही मनाला शिवूं नये. एवढी कमाई आपल्या हातून घडावी तेव्हां ब्रह्मप्राप्ति हाताजवळ येऊं शकते. सर्वांठायीं एकाच आत्मारामाची अनुभूति यावी. जे वेदांती असतात त्यांच्याच वाट्याला ही शाश्वत सुखसमृद्धि येत असते.

—श्रीसाईसच्चरित्

---


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४४ वें ] मे १९६६ [ अंक १४ वा

: संपादक :

श्री. बी. जी. पोतनीस

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ४४३३६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०, बी, दादर, मुंबई १४.

## प्रिय वाचक—

भारतांत श्री. शंकराचार्य ही एक अवतारी महान् विभूति होऊन गेली. ज्ञानदेवां-प्रमाणें त्यांच्या वांट्यास अल्पायुष्य आले असले तरी त्या अल्पावधींत त्यानीं केलेलें कार्य अत्यंत आश्चर्यकारक व धार्मिक तसेंच अध्यात्मिकदृष्ट्या भारी मोलाचें आहे.

त्यांचा जन्म दोन हजार वर्षांपूर्वी झाला. बुद्धितत्त्वज्ञानाला टक्कर देऊन जनतेला जरूर तें ज्ञानदान करण्यासाठीं त्यांचा अवतार. आमचे वेद, उपनिषदें, ब्रह्मसूत्रे व गीता यांच्यावर टीका लिहून त्यानीं आम्हां भारतवासीयांचे योग्य वेळीं जरूर तें मार्गदर्शन केलें.

श्रीशंकराचार्य म्हणजे बुद्धीचा महासागर. त्यांच्या तीक्ष्ण बुद्धीला अगम्य असें कांहींच नव्हतें. त्यानीं आमच्यासाठीं सारें ज्ञान सुगम करून ठेविलें. ठायींठायीं आदि-पीठांची स्थापना करून त्यानीं सुसंघटीतरीतीनें धर्माचा व अध्यात्मिक ज्ञानाचा अव्याहत प्रचार होत राहील अशी सुव्यवस्था करून ठेविली.

सारा भारत त्यानीं पायांखालीं घातला. आमची धार्मिक व सामाजिक असहाय्यता व अव्यवस्था अवलोकन केली आणि आमचें जीवन सुसंवादी, सुंदर व सुसह्य व्हावें यासाठीं त्यानीं शक्य तें सर्व केले.

गेल्या महिन्यांत त्यांची जयंती साजरी झाली. त्यांचें पुण्यस्मरण आम्हीं सर्वांनीं भक्तिभावानें व आदरानें करावें असें अपरंपार त्यांचें कर्तृत्व आहे. किती साध्या, सोप्या भाषेंत त्यानीं आम्हांला आमच्या सुखासमाधानाचा मार्ग दाखवून दिला आहे ?

> भज गोविंदं भज गोविंदं
> गोविंदं भज मुढमते
> संप्राप्ते सन्निहिते काले
> नहि नहि रक्षति डुकृंकरणे

त्यांचा हा सुश्लोक लाख मोलाचा आहे. तो भक्तिमार्गावरील दिव्य प्रदीप आहे. आमचें जीवन सुंदर व सुसह्य बनविणारा जीवनाधार आहे. देवाचें भक्तिपूर्वक नामस्मरण करा. तुम्ही कितीही पदव्या मिळविल्या, व्याकरणे, वेद उपनिषदें यांची कितीही घोकं-पट्टी केली तरी तुम्हांला, तुमच्या थकल्याभागलेल्या जीवाला विश्रांति, सुख, समाधान देण्याचें सामर्थ्य त्यापैकीं कशांतही नाहीं. तें फक्त आहे भज गोविंदंमध्यें.

शंकराचार्य हे युगप्रवर्तक महापुरुष होऊन गेले. त्यानीं हिंदु समाजाच्या एकंदर रचनेंत व आमच्या अध्यात्मिक जीवनांत क्रांति घडवून आणली.

व्यास महर्षि, शुकमुनी या वर्गांतील थोरांमध्यें ज्यांची गणना करता येईल असे होते श्रीशंकराचार्य. समाजाच्या उत्थापनासाठी त्याग करणें, सर्वस्व मानवी उद्ध-

तीला समर्पण करणें, हीच सर्वोत्तम भक्ति. तीच मोक्ष. हें ज्यांनीं स्वतःच्या उदाहरणाने दाखवून दिलें, ज्ञानप्राप्ति व ज्ञानदान हीं दोन तत्त्वें ज्यांनीं अखंड आपल्या उराशी बाळगली व आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्या तत्त्वाचें आचरण केलें असे होते थोर शंकराचार्य. भारतांत गेल्या दीड दोन हजार वर्षांच्या काळांत जी संत व सत्पुरुष मालिका निर्माण झाली व ज्यांनीं लोकशिक्षणाचें व जनतेच्या मार्गदर्शनाचें कार्य अखंड व अव्याहत चालविले आहे ती त्यांचीच पुण्याई होय.

शंकराचार्यांनीं बीं पेरले, त्याची उत्तम प्रकारें मशागत केली व त्याचेंच पीक आजकाल आम्हीं घेत आहोंत व पुढेंही यावच्चंद्रदिवाकरौ घेत राहूं.

श्रीशंकराचार्य यांच्यापुढें ध्येय एकच होते. लोककल्याण हेंच तें एकमेव ध्येय होय. त्यासाठीं त्यांनीं संन्यासधर्माची कास धरली व त्याच धर्माचा ध्वजा हातीं घेऊन व त्यांचें लोककल्याणाचे ध्येय दृष्टीसमोर ठेवून त्या मार्गाने जाणाऱ्यांची परंपरा आजवर अखंड चालू आहे व पुढेंहि ती चालू राहील. रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद आदि सत्पुरुष त्याच मालिकेंतले. संत तुकाराम, रामदास यांनींही तेंच ध्येय स्वतःपुढें ठेवलें. श्रीसाईबाबांनीं तेंच लोककल्याणाचें ध्येय आमरण आचरणांत आणले.

अशा त्या थोर विभूतीला आमचे शतशः प्रणाम.

—संपादक

MATUNGA CLEANING WORKS

ESTD. 1934 *Prop.* S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

A Pleasure to You—A Satisfaction to Us

Chemical Cleaners, Super Fine Darners

Master Dyers

*FOR*

Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths




# भक्तांचे अनुभव

सौ. श्री शहाणे बिजयनिवास, राथवाडी कॅडेल रोड, दादर, मुंबई ह्या आपला अनुभव पुढीलप्रमाणें कळवितात—

## अमृत झालें जहराचें

श्रीसाईबाबांचा आम्हाला इतक्यावेळा साक्षात्कार झालेला आहे आणि होत असतो कीं त्या विषयीं लिहायचंच म्हटलं तर शब्द अपुरे पडतील. पण असे अनुभव आल्यावर लिहिल्याशिवाय रहावत नाही. किंबहुना ते लिहून घेणारेदेखील बाबाच ! प्रत्यक्ष याचा माझा अनुभव.

माझें माहेर आहे कोंकणातल्या एका खेडेगावांत. तिथें आमचं कौलारू घर आहे. अगदीं पांच–पंचवीस माणसांनी रहायचं म्हटलं तरी प्रशस्त घर आहे. पण अशा घरांत रहाते मात्र माझी एकटी एकवडी आई ! तिला चांगले कमावते दोन मुलगे आहेत. पण तिला कुणीच विचारत नाहींत. त्यांना चांगल्या नोकऱ्या आहेत. परंतु आईला विचारायची दानत नाहीं. आईची जबाबदारी ही आपली नाहींच; या भावनेने ते म्हाताऱ्या आईला किंमत देतात, मान देतात. आईविषयीं आदर बाळगतात तो उपेक्षेचा ! जन्मदात्या आईविषयीं ही भावना ! अन् सांगण्याचे तात्पर्य असें कीं, ह्याचा फायदा म्हणजे आईला तिथल्या लोकांपासुन उपद्रव ! विशेषतः मुलगे विचारत नाहींत, त्यांना आपली जागा–जमीन नको आहे, मग ह्या म्हातारीची कटकट गेली कीं सारं रान आपल्यालाच मोकळं ! ह्या भावनेने वागणाऱ्या लोकांशीं किती गोडी-गुलाबीने आणि नमतें घेऊन वागावं लागत असेल बिचारीला ? शेतजमीन आहे ती देखील वर्षभर पुरेल इतकी नाहीं. अशा परिस्थितींत राहाणाऱ्या, ह्या बाईवर एकदां आलेला प्रसंग मी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिला आहे त्याची हकिकत अशी—

उन्हाळा असल्यानें जिकडेतिकडे पाणी आटलेलें, नदिनाले कोरडे पडलेले. गुरेढोरे पाण्यासाठीं तळमळत. अगदीं लांब एका डोहावर जाऊन शेवाळलेल्या पाण्यावर तहान भाग-वत बिचारी ! गांवातल्या ठराविक दोनतीन विहिरींनाच पाणी अगदीं खोल गेलेले होते. सबंध गांव त्या विहिरीवर लोटत असे. एका ओढ्याच्या कांठीं लहान डुरा ( अगदी कमी

खोल विहीर ) आहे.त्यांत जिवंत झरा असल्यामुळे सुमारें तासाभऱ्यांत तीनचार घागरी पाणी सांठत असे. असें पाणी सांठलें कीं त्या इुऱ्याजवळचे लोक संधी न गमावतां आंत उतरून पाणी वाटीनें गोळा करून नेत. असेच एकदां सातआठ घागरी पाणी सांठले. मी व माझी बहीण तें पाहातांच पुढें न जाता तें पाणी भरून आणलें. आईनें लवकर आंघोळ केलीच होती. ती लगेच पाणी मिळालें म्हणुन स्वयंपाकाला लागली. आम्हीं मग कपडे धुण्यासाठी व आंघोळीसाठीं पुढच्या विहिरीवर निघून गेलो. येतांना परत त्याच इुऱ्याच्या वाटेवरून आलों तर! तर! आमची मोलकरीण तो कातळ स्वच्छ धुऊन पाणी सांठण्याची वाट पाहात होती. तिला आम्हीं आनंदाने सांगत सुटलों कीं, मघाशींच आम्हाला पांचसहा घागरी पाणी मिळालें. तें ऐकून ती केव्हढ्यांदातरी दचकली. अन् म्हणाली, "बन्साबाय अवो! घात झाला. तुमी त्यें पानी न्हेलंव? अव त्या पान्यात साप मारून किंवो टाकला होता! तो काढून माझे दीर गेले आणि पाणी काढून टाकायसाठींच तर त्यांनी मला हतं पाटवलं. म्या म्हटलं टाकलं असेल वाडीतल्या कोणीतरी. जावा जावा आधी घराला जावा! अन् सासूबायला म्हनाव जेवन त्या पान्यांत नका करूं!"


घाबऱ्या घाबऱ्या घरीं गेलो तर! तर काय सांगावं? आईचा सारा स्वयंपाक तयार होता. पण ज्या लोकांनी हे कृत्य केलें होते ते परिणामाची वाट पहात होते; विशेषतः आमच्या आईच्या भवितव्यावर ज्यांचे भवितव्य अवलंबून होते त्यांना वाटलं आतां ही माणसं हे अन्न फेकून देतील! अन् अन्न फुकट गेलं तरी दुपारच्या रणरणीत उन्हात ह्या लोकांना क्लेश झाले ते काय कमी झाले? ह्या समाधानात ते लोक होते. आसपासच्या लोकांकडे अथवा इतर जे कोण होते. देवजाणे—ह्या कृष्णकृत्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करून मी क्षण दोन क्षण विचार केला. मनोमन श्री साईबाबांची प्रार्थना केली. एक मूठ उदी घेतली. त्या सर्व पिण्याच्या पाण्यात व अन्नात कालवून घातली. ( मी कोठेंहि गेलें तरी बाबांच्या उदीशिवाय घराबाहेर पडत नाहीं. ) अन् म्हटले, बाबा आज आम्हांला उपास घडावा अशी तुमची इच्छा असल्यास घडवा. पण माझी आई त्यांतलं पाणी पिऊव चुकली होती. हें सांगतांच तिला मळमळायला लागलें. घाबरून माझा जीव व्याकूळ झाला. अन् आईचं ओकणं चालू असतां तिला उदी पाजून मी बाबांची परत प्राथना केली. देवा-साईराया, तें अन्न मी फेकून देणार नाहींच, पण तुमच्या उदीचा प्रसाद त्यांत घालून आम्हीं तें अन्न खाणारच. नाहींतरी तुझें नाम घेतां-अमृत होई वीष वस्तूचे! मग तुझ्या परवानगीनें आम्हीं तें अन्न खाणारच! तुझी कृपा. विपरीत घडलंच तर! तर तुझें अन्न घेता घेतां काय व्हायचें तें व्होवो. आईने देवाची पूजा केलीच होती. उदी घातलेले अन्न व पाणी! आम्ही सर्व जेवलों. आइला बळेंच थोडें खाऊ घातलें. तिला ओकाऱ्या झाल्यामुळें कांहीं खाववतच नव्हतें. जेवून मी ओटीवर आलें. आणि आश्चर्य असें, तेवढयात वाडींतला एक माणूस आला आणि म्हणाला, "काय तुम्हाला समजलं तें खरं समजलात?" अहो साप टाकला होता हें खरं. मी लगेच जाऊन तें पाणी उपसून काढून टाकलें. आंत राख वगैरे टाकून साफ केलें. मग कुठें विष रहाणार? तो आपल्या

मुलासाठीं थोडा भात व भाजी मागायला आला होता. आम्ही जेवलेल्या जेवणातलेंच त्याला दिलें. आज एक वर्ष होऊन गेलें. आम्ही सर्व खुशाल आहोंत. तो मुलगा बरा आहे. ज्या गृहस्थानं आपल्या अधिकाराचा फायदा घेऊन हें घडवून आणलें त्याला आपली भाकरी टिकवणें आतां कठिण झालंय. दुसऱ्याच्या तोंडची भाकरी काढूं पहाणाऱ्या माणसाला बाबा थोडीच शिक्षा केल्याशिवाय राहातील ? बाबांच्या कृपेनें विषाचं अमृत झालं मग आम्हीं तें टाकावं काय ! बाबांचा अमृतमय प्रसाद मिळाल्यावर असल्या क्षुद्र विषारी लोकांच्या विषाची पर्वा कां करा ! हे लिहून काढण्यामागे दोन उद्देश आहेत. बाबांच्या कृपाछत्राची आमच्या हितशत्रूंना जाणीव होवो.

ज्या नात्यांतल्या लोकांमुळें असे प्रसंग ज्या गरीब बाईवर येतात, त्या बाईच्या सुपुत्रांना अथवा पुत्रींना त्याची कितपत जाणीव आहे ते पाहाणे व त्या बिचारीचे आयुष्यांतले शेवटचे दिवस तरी गोड व्हावेत म्हणून त्यांच्यांत सुधारणा व्हावी हाच उद्देश. नाहींच सुधारणा झाली तर 'सारा भार माझा, घालून बाबांवर, मी राहीन निर्धोर सर्वकाळ—


## जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान करण्यासाठीं बलवान व्हा.** यासाठीं नियमित व्यायाम आणि खेळ खेळणें जरूर आहे. यासाठीं लागणारी उपकरणें म्हणजे डबेल्स, लेझीम...यासारखा सर्वश्रेष्ठ माल आम्ही बनवितो. नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, व्यायाम शाळा, विकास केंद्रें यांना माल पुरवितो.



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स** ८५ बापू खोटे स्ट्रीट, मांडवी मोहोल्ला, मुंबई ३

प्रोप्रायटर—डी. एच्. साखरकर

# श्रीज्ञानेश्वरांचें जीवनकार्य

— गुरुदेव रानडे

श्रीज्ञानेश्वरांच्या आयुष्यांतील कांहीं गोष्टी थोडक्यांत पुढीलप्रमाणें सांगतां येतील : संन्यास घेतल्यावर पुनः गृहस्थपण पत्करलेल्या एका थोर भगवद्भक्ताच्या पोटीं श्रीज्ञानेश्वर, श्रीनिवृत्ति, सोपान व मुक्ताबाई हीं भावंडें जन्मास आलीं. त्या काळच्या सनातनी समाजानें या मुलांचे अनन्वित व अत्यंत छळ केले. श्रीनिवृत्ति-ज्ञानदेवांच्या मुंजी करण्याचें ब्राह्मणवृंदानें नाकारलें. विठ्ठलपंत मुलांस घेऊन नासिकास आले व ब्रह्मवृंदांनीं सांगितलेल्या प्रायश्चित्तार्थ ते रोज त्र्यंबकेश्वराजवळील ब्रह्मगिरीस प्रदक्षिणा घालूं लागले. सर्व मुलांना बरोबर घेऊन याप्रमाणें प्रदक्षिणा घालीत असतां, एकदां एक वाघ त्यांच्या अंगावर धांवून आला. ते सर्व भयभीत होऊन वाट मिळेल तिकडे धांवत सुटले. श्रीज्ञानेश्वर, सोपान व मुक्ताबाईंना घेऊन विठ्ठलपंत घरीं परत आले. श्रीनिवृत्तिनाथ घरीं परत आले नाहींत. त्यांची, वडिलांची व भावंडांची चुकामूक होऊन ते ब्रह्मगिरीच्या एका गुहेंत शिरले. तेथें त्यांची व गहिनीनाथांची गांठ पडली व गहिनीनाथांनीं श्रीनिवृत्तिनाथांस परमार्थाचा उपदेश केला. कांहीं दिवसांनीं ते घरीं परत आले. विठ्ठलपंत कधीं वारले हें नक्की माहीत नाहीं. त्यांच्या मरणानंतर श्रीनिवृत्तिनाथांनीं श्रीज्ञानेश्वरांना उपदेश दिला असावा हें उघड आहे. त्या सर्व भावंडांचा समाजाकडून होत असलेला छळ चालूच होता. पैठणच्या ब्रह्मवृंदाकडून शुद्धिपत्र आणण्यासाठीं हीं चारहि भावंडें पैठणास गेलीं. पैठण त्यावेळीं एक मोठें पवित्र क्षेत्र म्हणून सुप्रसिद्ध होतें. तत्कालीन पंडित हेमाडपंत व बोपदेव यांच्या मध्यस्थीनें या चौघां भावंडांना जें शुद्धिपत्र मिळालें तें ऐतिहासिकदृष्ट्या कितपत सत्य मानावें हें सांगणें कठीण आहे. पैठणच्या ब्राह्मणांना या मुलांची अद्वितीय बुद्धिमत्ता व त्यांचें असाधारण अध्यात्मज्ञान पाहून अत्यंत आश्चर्य वाटलें असावें व त्यांनीं जरूर तें शुद्धिपत्र दिलें असावें. ही गोष्ट शके १२०९ (इ. स. १२८७) सालीं घडली असें मानण्यांत येतें. हें शुद्धिपत्र घेऊन श्रीज्ञानेश्वर आपल्या भावंडांसह नेवासें या गांवीं आले. तेथें त्यांनीं आपल्या आत्मिक सामर्थ्यानें सच्चिदानंदबाबा यांचा असाध्य रोग बरा केला. यामुळें सच्चिदानंदबाबांस अत्यंत कृतज्ञता वाटून ते श्रीज्ञानेश्वरांचे "लेखकू" झाले. श्रीज्ञानेश्वरांनीं आपला अद्वितीय ग्रंथ—ज्ञानेश्वरी—या ठिकाणींच लिहून पुरा केला. नेवाशास ज्या खांबाजवळ बसून सर्व ज्ञानेश्वरी ग्रंथ लिहिला तो खांब अद्यापि दाखविण्यांत येतो. आपले गुरु श्रीनिवृत्तिनाथ आपलें प्रवचन ऐकत आहेत व तें आपण अत्यंत विद्वान् व संतश्रेष्ठ श्रोतृवृंदास समजावून सांगत आहों, अशी कल्पना करून श्रीज्ञानेश्वरांनीं हा ग्रंथ लिहिला आहे. श्रीज्ञानेश्वरांच्या गीतेवरील टीकेनें श्रीनिवृत्तिनाथ

पूर्ण संतुष्ट झाले नाहींत. त्यांनीं ज्ञानेश्वरांना एक स्वतंत्र ग्रंथ लिहिण्यास आज्ञा केली. त्याप्रमाणें श्रीज्ञानेश्वरांनीं "अनुभवामृत" किंवा "अमृतानुभव" हा ग्रंथ लिहिला, अशी परंपरागत एक आख्यायिका आहे. पुढें शके १२१५ (इ. स. १२९३) सालीं श्रीनिवृत्तिनाथ, श्रीज्ञानेश्वर, सोपान व मुक्ताबाई सर्वजण पंढरपुरास गेली असावींत असें दिसतें. तेथें श्रीज्ञानेश्वर व श्रीनामदेव यांची गांठ पडली व दोघांमध्यें मैत्री जडली. श्रीज्ञानेश्वरांना पंढरी—संप्रदायाबद्दल प्रेम वाटूं लागलें व ते या संप्रदायाचे पहिले अध्वर्यु बनले. श्रीनामदेव व श्रीज्ञानेश्वरांनीं पुढें सर्व उत्तर हिंदुस्तानचा प्रवास केला. ते कऱ्हाडमार्गानें पंढरपुराहून निघाले. हा मार्ग अद्यापि पहावयास मिळतो. या तीर्थयात्रेंत त्यांची व अनेक साधुसंतांची गांठ पडली व त्यांना यांनीं आपला परमार्थ मार्ग समजावून सांगितला असावा असें दिसतें. ही मोठी यात्रा संपवून ते अजमासें शके १२१८ (इ. स. १२९६) सालीं कार्तिक शु. ११ ला मोठ्या उत्सवाच्या दिवशीं पंढरपुरास परत आले असावेत. पौर्णिमेच्या दिवशीं हा उत्सव संपल्यावर श्रीज्ञानेश्वरांनीं आळंदीस जाण्याची आपली इच्छा श्रीनामदेवांना सांगितली व आपल्यास "जिवंत समाधी" घ्यावयाची आहे हेंहि श्रीनामदेवांना सांगितलें. श्रीनामदेव व इतर अनेक मोठे संत श्रीज्ञानेश्वरादि भावंडांबरोबर पंढरपूरहून आळंदीस आले. कार्तिक व. ११ ला रात्रभर कीर्तन व भजन करून जागरण केलें. कीर्तनानें सर्व दिशा दुमदुमून टाकल्या. द्वादशीचा दिवसहि याप्रमाणेंच कीर्तन--जागरांत घालविला. त्रयोदशीच्या दिवशीं आपण देह ठेवणार—जिवंत समाधी घेणार—हें वृत्त श्रीज्ञानेश्वरांनीं श्रीनिवृत्तिनाथांना सांगितलें. श्रीज्ञानेश्वरांच्या एका अभंगांत (व हा अभंग त्यांनींच लिहिला आहे असें मानतात) म्हटलें आहे कीं, देवाचें कीर्तन व ध्यान करीत श्रीज्ञानेश्वर समाधिस्थ बसले व अशा स्थितींतच त्यांचें प्राणोत्क्रमण झालें :

> ज्ञानदेवें घेतलें दान । हृदयीं धरोनियां ध्यान ॥
> समाधीं बैसला निर्वाण । कथा कीर्तन करीतसे ॥

श्रीनिवृत्तिनाथांनीं श्रीज्ञानेश्वरांच्या समाधीवर दगड ठेविला. आळंदीस सिद्धेश्वरांच्या देवळासमोर ही घटना घडली व ही समाधी आजदेखील पाहतां येण्यासारखी आहे. या देवळांत शिवलिंग आहे; व या देवळासमोर श्रीज्ञानेश्वरांनीं समाधी घेतली असावी असें वाटतें. सिद्धेश्वरांचे देऊळच सिद्धेश्वर नांवाच्या एका संताच्या अस्थींवर उभारलेली समाधी असावी हे अशक्य नाहीं. शिवाच्या नांवानें बांधलेलें हें देऊळ असावें व त्यास सिद्धेश्वर असें नांव दिलें असावें. या देवळाच्या बाजूस म्हणजे पश्चिमेस श्रीज्ञानेश्वरांच्या समाधीचें द्वार असलें पाहिजे. हे "आत्मज्ञानें उत्तरेकडे तोंड करून प्राण सोडावे" असें श्रीज्ञानेश्वरांनींच ज्ञानेश्वरींत जे सांगितले आहे त्याशीं विसंगत दिसतें. तथापि, ईश्वर जर पश्चिम व उत्तर दोन्ही दिशांना आहे, तर मरणसमयीं आत्मज्ञ कोणत्या दिशेस आपलें तोंड फिरवतो हा प्रश्न गौण आहे. श्रीज्ञानेश्वरांच्या बाबतींत हीच गोष्ट खरी ठरते. सिद्धेश्वराच्या देवळापुढें त्यांनी समाधी घेतली ही गोष्ट

निःसंशय आहे. श्रीज्ञानेश्वरापूर्वीहि कित्येक वर्षें सिद्धेश्वराचें देऊळ हें एक पवित्र क्षेत्र होतें, ही गोष्टहि सुप्रसिद्ध आहे. बरेच दिवस आधीं आळंदीस विठ्ठलभक्ति प्रचलित होती ही गोष्टहि सुप्रसिद्ध आहे. याप्रमाणें श्रीज्ञानेश्वरांची जिवंत समाधी ही एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट घडली व ज्ञानेश्वरांनीं आळंदीस समाधी घेतल्यामुळें आळंदी जगांतील एक मोठें क्षेत्र बनलें आहे.

## श्रीज्ञानेश्वरांचे ग्रंथ.

ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी व अभंग असें श्रीज्ञानेश्वरांनीं लिहिलेले ग्रंथ आहेत. ज्ञानेश्वरी व अमृतानुभव श्रीज्ञानेश्वरांनींच लिहिले याबद्दल कांहीं मतभेद किंवा शंका नाहीं. या दोन्ही ग्रंथांची भाषा, विचारसरणी व शब्दसंग्रह या सर्वांमध्यें इतकें साम्य आहे कीं ते एकाच ग्रंथकाराच्या लेखणींतून उतरले आहेत, हे कोणी सहज ओळखूं शकेल. ज्ञानेश्वरींत ( १७–३ ) " श्रीनिवृत्तिनाथ शिवापेक्षां श्रेष्ठ आहेत " असें ज्ञानेश्वरांनीं आपल्या गुरूचें वर्णन केले आहे. " म्हणोनि शिवेसी कंटाळा । गुरुत्वें तूंचि आगळा ॥ "; तसेंच अमृतानुभवांत प्रत्यक्ष शिव श्रीनिवृत्तींस मुहूर्त विचारतो, असें म्हटलें आहे. " शिवही मुहूर्त पुसे । जया जोशियातें " परंतु, अभंग व चांगदेवपासष्टी श्रीज्ञानेश्वरांनींच लिहिली किंवा नाहीं याबद्दल मात्र कांहीं लेखकांना शंका वाटते. हे लिखाणहि श्रीज्ञानेश्वरांचेंच आहे असें म्हणण्यास भरपुर पुरावा आहे हे आम्ही पुढें दाखविणारच आहो. अमृतानुभव ज्ञानेश्वरीच्या आधीं का नंतर लिहिण्यांत आला याबद्दलहि मतभेद आहेत. अमृतानुभव स्वतंत्र ग्रंथ असला तरी कांहींच्या मतें त्यांत ज्ञानेश्वरींतील उदात्त तत्त्वज्ञान किंवा उच्च आध्यात्मिक अनुभव नाहींत; म्हणून ज्ञानेश्वरी अमृतानुभावानंतर लिहिण्यांत आली असावी. उदाहरणार्थ, " ज्ञानदेवीशीं ( ज्ञानेश्वरीशीं ) तुलना केली असतां, अमृतानुभवाची भाषा, व त्यांतील शब्दसंपत्ति व कल्पना इतक्या अल्प, परिमित, मामुली व कंटाळवाण्या वाटतात कीं, हा ग्रंथ ज्ञानेश्वरीच्या आधीं लिहिला असावा असें म्हणण्यास कांहींच प्रत्यवाय नाही " असें प्रो. डब्ल्यू. बी. पटवर्धनांचें मत आहे. उलटपक्षीं, ज्ञानेश्वरींत उहापोह केलेल्या एका तात्त्विक प्रश्नाचा उल्लेख अमृतानुभवांत केला आहे; म्हणून ज्ञानेश्वरीनंतर अमृतानुभव लिहिला असावा असें म्हणतां येईल. " सुखसंगेने बध्नाति ज्ञानसंगेन चानघ " भगवद्गीतेंतील या श्लोकावर [ १४–६ ] ज्ञानेश्वरींत जी टीका लिहिली आहे, तिचा उल्लेख " वैकुंठीचेनिहि सुजाणें । ज्ञान–पाशीं सत्त्वगुणें । बांधिजे हें निरुपण । बहु केले ॥ " या अमृतानुभवांतील ओवींत स्पष्टपणें दिसतो, हें ज्ञानेश्वरीच्या वाचकांना निराळें सांगावयास नको. म्हणून ज्ञानेश्वरीनंतर अमृतानुभव लिहिला असावा असें मानल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

## ज्ञानेश्वरीची भाषाशैली.

ज्ञानेश्वरींत श्रीज्ञानेश्वरांचा जो कल्पनाविलास पाहावयास मिळतो, तो जगांतलि इतर कोणत्याहि देशाच्या वाङ्मयांत क्वचितच दिसून येईल, इतकी अप्रतिम या ग्रंथाची भाषाशैली आहे. कोणत्याहि तात्त्विक प्रश्नाचा उहापोह करीत असतां पदोपदीं साम्याचा

उपयोग करावयाचा हा ज्ञानेश्वर-कालीन विवेचनपद्धतीचा विशेष दिसतो. ज्ञानेश्वरींत श्रीज्ञानेश्वरांच्या अगाध व्यवहार ज्ञानाचा अनुभव पदोपदीं प्रत्ययास येतो. जगाचा इतका व्यापक, विशाल व गाढ अनुभव या ग्रंथकारास कसा मिळवतां आला व इतक्या लहान वयांत-म्हणजे पंधराव्या किंवा एकोणविसाव्या वर्षी—असा अलौकिक ग्रंथ कसा लिहितां आला ही एक खरोखरच अत्यंत आश्चर्यकारक गोष्ट आहे. ज्ञानेश्वरींतील प्रत्येक प्रश्नाची चर्चा इतकी प्रसादपूर्ण, इतकी सखोल, व इतकी आध्यात्मिक अनुभवाने परिपूर्ण आहे कीं, हा ग्रंथ मराठी भाषेंतील कोणत्याहि ग्रंथापेक्षां श्रेष्ठ आहे हें कोणत्याहि वाचकास कबूल करावें लागेल. श्रीज्ञानेश्वरांनीं ओवी-वृत्त वापरलें आहे व तें म्हणजे अभंगाचाच एक प्रकार आहे. वस्तुतः श्रीज्ञानेश्वरांच्या ओवीवृत्तांतूनच पुढें अभंग-वृत्त निघालें. श्रीज्ञानेश्वरांच्या व श्रीएकनाथांच्या ओवीच्या रचनेंत बराच फरक आहे. श्रीज्ञानेश्वरांची ओवी साडेतीन ओळींची आहे; तर श्रीएकनाथांची साडेचार ओळींची आहे. परंतु, श्रीज्ञानेश्वरांची ओवी निरुपमेय आहे, प्रो. डब्ल्यू. बी. पटवर्धनांनी या ओवीचें फार बहारीचें वर्णन केलें आहे : "श्रीज्ञानेश्वरांच्या हातीं ओवी बागडते, चौफेर धांवते, थयथय नाचते, गिरक्या मारते, मंद गतीनें चालते, दुडकी धांवते, भरधांव पळते, लांब किंवा आंखुड उड्या मारते, थबकते, सटकन् निसटते, नदीच्या पुराप्रमाणें समोर आलेल्या सर्व वस्तूंसह धो धो वाहत जाते. याप्रमाणें ही ओवी मालकाच्या इच्छेनुरूप अनेकविध कलापूर्ण गतींचा विलास करून दाखविते. नादमाधुर्याच्या किंवा स्वरसंमेलनाच्या बाबतींतहि या ओवीचे अनेकविध विलास व सामर्थ्य पाहून मन आश्चर्यानें थक्क होतें : रोमांच, कंप, गर्जना, निनाद, बुदबुद, कुरकूर इत्यादि अनेक नादांचा प्रत्येक सूक्ष्म सूर प्रसंगानुसार या ओवीत प्रतिध्वनित झाला आहे. मालक या वाद्यास हात लावण्याचा अवकाश कीं त्यांतून वाटेल तो राग व सूर वाटेल त्या मंद्र, मध्यम, किंवा तीव्र स्वरांत निघतो." याच विद्वान् प्राध्यापकांच्या आणखी एका उताऱ्यावरून ज्ञानेश्वरीची वाङ्मयीन योग्यता किती श्रेष्ठ आहे याची कल्पना येईल : "वाङ्मयदृष्ट्या ज्ञानदेवी इतकी अद्वितीय, सुंदर व निरतिशय काव्यमय आहे व त्यांतील ध्वनि, श्लेष, उपमादि अलंकार इतके बहुमोल आहेत व भाषा इतकी ओघवती व प्रासादिक आहे, प्रतिभा-विलास इतका रम्य आहे व कल्पनेच्या भराऱ्या इतक्या उंच व आल्हादकारी आहेत, विचारसरणी इतकी उदात्त आहे व पदलालित्य इतकें श्रवणमनोहर आहे व विचार इतके उज्ज्वल व प्रतिभासंपन्न आहेत, अभिरुचि इतकी नितान्त पवित्र आहे कीं ज्ञानेश्वरीचा मुख्य हेतु नवीन मत प्रतिपादन हा नसून मूळ गीतेचा अर्थ जास्त स्पष्ट करून सांगावयाचा असल्यामुळें प्रतिभेला साहजिकच अनेक बंधनें पाळावीं लागत असलीं, तरी वाचक या ग्रंथाने अत्यंत मोहित होतो. त्यांतील वाङ्मय-सागराच्या लहरीवर तो आनंदातिशयानें तरंगत राहतो, त्यांतील शब्दसंगीतांत व अत्यंत व्यामोहकारी नादमाधुर्यांत तो इतका तल्लीन होऊन जातो कीं, त्याच अंतःकरण कृतज्ञतेनें भरून येतें व विचारास मुळीं अवकाशच राहत नाहीं."

## ज्ञानेश्वरीसंशोधनाचा इतिहास.

श्रीज्ञानेश्वरांनीं सच्चिदानंदबाबास लिहून घेण्यास सांगितलेली ज्ञानेश्वरीची अस्सल प्रत आज उपलब्ध नाहीं. शके १५०६ (इ. स. १५८४) मध्यें श्रीएकनाथांनीं जी ज्ञानेश्वरांची मूळ प्रत संशोधून तयार केली ती जवळजवळ मूळ प्रतीइतकीच शुद्ध आहे. या संशोधनाची हकीगत अशी आहे : श्रीज्ञानेश्वरांनी देह ठेविल्यावर तीनशें वर्षांनीं श्रीएकनाथ घशाच्या एका दुर्धर रोगानें आजारी पडले. त्यावेळीं एकदां श्रीज्ञानेश्वर त्यांच्या स्वप्नांत दिसले; व 'अज्ञान वृक्षाच्या एका मुळीनें माझ्या गळयाभोंवतीं विळखा घातला आहे; तूं आळंदीस येऊन तो सोडीव" असें त्यांनीं श्रीएकनाथांना सांगितलें. तेव्हां श्रीएकनाथ आळंदीस गेले व श्रीज्ञानेश्वरांच्या आज्ञेप्रमाणे केलें. या प्रसंगास अनुलक्षून श्रीएकनाथांनीं एक अभंग लिहिला :

ज्ञानदेवें येऊनी स्वप्नांत । सांगितली मात मजलागीं ॥
दिव्य तेजःपुंज मदनाचा पुतळा । परब्रह्म केवळ बोलतसे ॥
अज्ञान वृक्षाची मुळी कंठासि लागली । येऊनी आळंदी काढा वेगीं ॥
ऐसे स्वप्न होता आलों अलंकापुरीं । तव नदी माझारीं देखिलें द्वार
एका जनार्दनीं पूर्वपुण्य फळलें । श्रीगुरू भेटले ज्ञानेश्वर ॥

श्रीज्ञानेश्वरांच्या समाधींत जाण्यास नदींत वाट सांपडली, असें या अभंगांत म्हटलें आहे. सिद्धेश्वरांचें लिंग व ज्ञानेश्वरांची समाधी या दोहोंमध्यें असलेल्या नंदीच्या मूर्तीखालून समाधींत जाण्याचे द्वार आहे असें हल्लीं आळंदींत दाखविण्यांत येतें. श्रीज्ञानेश्वर या दारानें आंत गेले असले तर त्यावेळीं इंद्रायणीचें पाणी या देवळानजीक वाहत असावें व हें देऊळ नदीच्या पात्रांत असावें असें दिसतें. हें कसेंहि असो. श्रीएकनाथ या द्वारानें आंत गेले व श्रीज्ञानेश्वरांनीं सांगितल्याप्रमाणें त्यांच्या गळयाभोंवतालचा विळखा सोडविला. या श्रेष्ठ संतांच्या समाधीदर्शनामुळें ज्ञानेश्वरीचें संशोधन करण्याची स्फूर्ति श्रीएकनाथांना झाली असावी. या संशोधन-कार्याचें स्वरूप कै. भारद्वाजांनीं पुढील-प्रमाणें वर्णिलें आहे. "त्यांनीं कांहीं ओव्या वगळल्या व कांहीं नवीन घातल्या. काही जुने शब्द बदलून सहज कळतील असे नवे शब्द घातले." श्रीएकनाथांनीं ज्ञानेश्वरीची भाषा सुधारून आधुनिक केली असे म्हणण्यास फारसा आधार नाहीं. कारण श्रीएकनाथांनीं ज्ञानेश्वरीतील ओव्यांमध्यें फेरफार करण्याचें धाष्टर्य केलें असे म्हणणें चुकीचें होईल. नवीन ओव्या गोंवून ज्ञानेश्वरीच्या मूळ प्रतींत फेरफार करणें म्हणजे "अमृताच्या ताटांत नरोटी ठेविल्याप्रमाणें होय" असें जें श्रीएकनाथांनींच या ज्ञानेश्वरीच्या हस्तलिखित प्रतींत शेवटीं लिहिलें आहे, यावरून त्यांनीं एकहि ओवी गाळली नाहीं व एकहि ओवी नवीन घातली नाहीं हें सिद्ध होतें. श्रीएकनाथांनीं त्या काळच्या भाषासरणीस जुळेल इतका अद्यावत्पणा मूळ प्रतींत आणला असावा असें दिसतें. यामुळेच श्रीएकनाथांनीं संशोधिलेली प्रत पुढे तीन शतकें प्रमाणभूत मानण्यांत आली. अलीकडे कै. वि. का. राजवाडे यांनीं जी आवृत्ति प्रसिद्ध केली आहे त्या

'ज्ञानदेवीं'त आठ हजार आठशें शहाण्णव (८८९६) ओव्या आहेत; तर श्रीएकनाथांच्या आवृत्तींत बरोबर नऊ हजार (९०००) ओव्या आहेत. श्रीएकनाथांनीं त्या वेळीं सुधारलेल्या ज्ञानेश्वरीच्या प्रतीपेक्षां आपण प्रसिद्ध केलेली प्रत बरीच जुनी आहे असें कै. राजवाड्यांचें म्हणणे आहे. आपल्या मते ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत कोणती हे ठरवून ती कै. माडगांवकरांनीं प्रसिद्ध केली व हीच खरी विश्वसनीय प्रत आहे असा त्यांचा दावा आहे. त्यांची 'ज्ञानदेवी' श्रीएकनाथांच्या 'ज्ञानेश्वरी'पेक्षां फारशी भिन्न नाही. परंतु, ही श्रीएकनाथांची ज्ञानेश्वरीची आवृत्ति दुर्दैवाने अप्रसिद्धच राहिली; म्हणून ती कशी होती हे ठरण्यास पुरेसा पुरावा अद्यापि उपलब्ध झालेला नाही. या संशोधनाच्या कामास कालांतराने यश येऊन श्रीएकनाथांनीं सुधारण्यासाठी वापरलेल्या ज्ञानेश्वरीच्या मूळ प्रतीचा शोध लागला म्हणजे त्या आधाराने बाकी सर्व प्रती ताडून पाहतां येईल; व शक्य तितकीं ज्ञानेश्वरांनींच सांगितलेली मूळ प्रत प्रसिद्ध करतां येईल तो सुदिन होय.

## दोन ज्ञानेश्वर वाद.


श्री ज्ञानेश्वरांच्या अभंगांचा विचार करूं लागतांच "दोन ज्ञानेश्वरांचा" अत्यंत कठीण प्रश्न पुढें उभा रहातो. गेल्या पन्नास वर्षांत यासंबंधीं अनेक विद्वान् लोकांमध्यें मोठा वाद माजून राहिला आहे. कै. भारद्वाजांनीं कांहीं लेख लिहून अभंग लिहिणारे 'ज्ञानदेव' व ज्ञानेश्वरी—अमृतानुभव लिहिणारे ज्ञानेश्वर एक नव्हेत असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. ज्ञानेश्वरीचे लेखक आपेगांवीं राहिले व तेथेंच वारले; ते पंढरीचे सांप्रदायिक नसून शैव (शिवभक्त) होते. उलटपक्षीं अभंगांचे लेखक ज्ञानदेव आळंदीस राहिले व तेथेंच वारले; ते महानुभवी संप्रदायाचे असले; तरी पंढरीचे भक्त होते. आपल्या विधानांच्या पुष्ट्यर्थ त्यांनीं पुढील मुद्दे मांडले आहेत.

(१) अभंग ज्ञानेश्वरी यांची विवेचनपद्धति, भाषा व विचार अत्यंत भिन्न आहेत; (२) अभंगांत फक्त विठ्ठलभक्ति वर्णिली आहे; तर ज्ञानेश्वरींत विठ्ठलाचा किंवा विठ्ठलभक्तीचा उल्लेख मुळींच नाहीं; (३) आपेगांवास दोन समाध्या एकत्र असून त्यांतील एक ज्ञानदेवांची असावी असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्या गांवच्या कुलकर्ण्यांच्या नोंदबुकांत कांहीं जमिनी "ज्ञानदेवाच्या समाधीकडे" दिल्याचा उल्लेख आहे. या सर्व मुद्यांचा आतां आपण साधक–बाधक विचार करूं.

## ज्ञानेश्वरी व अभंग यांतील भाषा–विचार–साम्य.

ज्ञानेश्वरीचे लेख व अभंगकर्ते हे निराळे असावेत असें मानण्यास मुख्य कारण म्हणजे या दोन लिखाणांतील 'भाषा व विचार' यांत कांहींच साम्य नाहीं, हें होय. परंतु, ही समजूत अत्यंत चुकीची आहे. ज्ञानेश्वरीपेक्षां नंतर प्रसिद्ध झालेल्या अभंगांची भाषा जास्त सोपी वाटते याचें कारण लोक हे अभंग आज सहाशें वर्षें तोंडपाठ करीत आले, व नंतर स्मरणशक्तीच्या सहाय्यानें ते लिहून प्रसिद्ध करण्यांत आले यामुळें अभंगांची भाषा जास्त आधुनिक वाटते. याच कारणामुळें 'अमृतानुभव'

ज्ञानेश्वरीपेक्षां प्राचीन वाटतो. कारण याचें पाठांतर लोक ज्ञानेश्वरी इतकें करीत नाहींत. भाषेच्या आधुनिकपणावर आधारलेल्या या मुद्याचा सांगोपांग विचार अद्यापि झालेला नाहीं. " अभंग व ज्ञानेश्वरी यांमध्यें कांहींच भाषासाम्य नाहीं असें विधान प्रो. पटवर्धनांनीं केलें आहे. परंतु, या दोन्ही ग्रंथांत सामान्यपणें आढळणाऱ्या कांहीं विशिष्ट आर्ष व जुन्या शब्दसमूहाकडे यांचें दुर्लक्ष झालें आहे असें म्हणावें लागतें. उदाहरणार्थ : सारखेडिया, बिक, पातेजोनि, नीच–नवा, बखंट, बुंथी, गळाळा, संवसाटी इत्यादि अनेक शब्द दोन्ही ग्रंथांत वापरले आहेत. ज्ञानेश्वरीचा विशिष्ट शब्द-संग्रह अभंगांत आढळत नाहीं असें म्हणणें धाष्टर्याचें होईल. हे शब्द त्याच विभाक्तिप्रत्ययांत वापरलेले आढळत नाहीत, याचें कारण वर म्हटल्याप्रमाणें अभंग कालांतरानें स्मरण-शक्तीच्या आधारानें लिहिण्यांत आले हें होय. या शब्दांच्या मूळ रूपांकडे पाहिलें तर ज्ञानेश्वरी व अभंग यांत बरेंच साम्य दिसून येतें. विचारसंपत्तीच्या दृष्टीनें ज्ञानेश्वरीपेक्षां अभंग कमी श्रेष्ठ ठरतात, या म्हणण्यांतही फारसा अर्थ नाहीं. ज्ञानदेवांच्या सर्व अभंगांचा अभ्यास केल्यास अभंगांतील विचार ज्ञानेश्वरींतील विचारांइतकेच किंबहुना जास्त प्रतिभासंपन्न आहेत असें निःसंकोचपणें म्हणतां येईल. अभंगांत ज्ञानेश्वरांनीं आपलें सारें अंतःकरण ओतलें आहे.




## लहान मुलांच्या आंकडीवर

### जुनें आणि प्रसिद्ध औषध

### जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# ईश्वरी साक्षात्कार आणि भक्त

—निसर्गदत्त महाराज

श्री सिद्धरामेश्वर महाराज पाथरीकर यांचे परमशिष्य श्री निसर्गदत्त महाराज हे साक्षात्कारी सत्पुरुष असून मुंबईत प्रवचनद्वारा आपल्या भक्तांना ते मधून मधून ज्ञानामृताची जोड करून देत असतात. त्यांच्या प्रवचनांपैकीं दोन प्रवचनांचा सारांश आमच्या वाचकांसाठीं या अंकांतून देण्यांत येत आहे.

साक्षात्कार या शब्दाचा अर्थ परिचय असा होतो. ईश्वर शब्दाचा अर्थ अखिल चैतन्याचा उकल होणें असा आहे. भक्ताचे जीवित आणि ईश्वर, नांवे दोन पण जीवित एकच आहे, म्हणून जातीनेच भक्त ईश्वरासी अनन्य शरण आहे. ईश्वर दर्शन झालें म्हणजेच भक्ताला न्याय मिळाला मग न्याय आणि अन्याय कळूं लागतो, सार आणि असार, योग्य आणि आरोग्य, स्थिर आणि अस्थिर हें कळल्यामुळें तो मुक्त होतो. ईश्वर दर्शन झालें नाहीं तोंपर्यंत न्याय अन्याय कळत नाहीं. ईश्वर दर्शनानें व्यक्तित्वभाव लय पावतो, केवळ व्यक्तभाव जाणवतो व्यक्त आणि अव्यक्त स्पष्ट दिसतें. आपण व्यक्ति ही भावना मावळल्यामुळें स्वार्थसंचय भावना रद्द होते. स्वार्थ-संचय भावना असेपर्यंत तो न्याय देऊं शकत नाहीं. न्याय म्हणजे काय हें पुरतें त्याला कळतही नाहीं. आपण व्यक्ति ही भावना जाऊन व्यक्तभाव जेव्हां निर्माण होतो तेव्हां आपण केवळ ज्ञानरूपच आहोंत असा बोध होऊन रहातो. तरीपण हा कालअनुभव-जन्य असल्यामुळें व्यवहारप्रतीत असतो. व्यवहार करणें आणि करविणें हा प्रसंग उमटत असतो. आत्मानुभवी साधुसंत हा चिद्संविद्चा खेळ आहे, म्हणून मौजेनें यथायोग्य व्यवहारक्रिया करीत असतात. व्यवहारकाळीं अनेक नामरूपाचा स्वतःशीं उल्लेख घेऊन व्यवहार करितात त्यामुळें इतरेजनाप्रमाणें तेही देहधारी देहाभिमानी आहेत असें वाटतें. ते स्वतःच्या स्वानुभवानें केवळ ज्ञानस्वरूप शुद्ध चैतन्यच, व्यवहार आणि व्यावहारिक रूपें घेऊन नटलेले आहे; आणखी नवीन नवीन नटनाटय करीत आहे असें पहातात. व्यवहारकाळीं दुःखशोक इत्यादिंची तिरीप त्याला कळते परंतु त्याची तिडीक त्याला मारत नाहीं. अर्थात जगांतील सुखदुःखें नफ्यातोट्यामुळें तो विव्हळ होत नाहीं. असह्य असा व्यवहारजन्य व्यवहार प्रसंग त्याला सहज सौम्य होतो. व्यवहारांतील लहानशा कारणामुळें जीवाला जो असह्य जाच होतो, तोच ईश्वरभक्ताला जगांतील महाअनर्थ-कारणीं, महाप्रसंगसुद्धां सहज सौम्य वाटतो आणि अशा प्रसंगांतही विश्वजनाला सहज

सुलभ मार्ग तो दाखवूं शकतो. तरीपण आपल्या समजुतीचा अहंकार घेऊन प्रथम प्रथम त्याचें म्हणणें लोक मानीत नाहींत. परंतु प्रत्ययानें अनुभव येतां येतां हळूहळूं त्याचे कडे वळतात. तो केवळ एक आपण न्याय आहे असाच वर्ततो. न्याय स्वरूप भगवंताला स्वत:करिता घरदार, आप्त स्वकीय असें काही नाही. विश्वजनाला सुख, आराम होणें हाच त्यांचा जणूं आत्मसंचय असतो. शिवाय त्या निराकार ज्ञानस्वरूप ज्ञानदेवतेला आत्मस्वार्थ असा काहीं नाहीं. हेंच भगद्भक्ताचे जागतें ( व्यावहारिक ) स्वरूप आहे.

## आत्मसाक्षात्कार

आपण असल्याचा आपणांला अनुभव, सभोंवार पसरलेलें जग आणि त्याला आधारभूत असलेली कोणी महाशक्ति हा अनुभव एकदमच येतो. यापूर्वी आपण असल्याचा आपणांला अनुभव नसल्यामुळें, जग किंवा कोणी ब्रह्म आहे असें असल्याचा अनुभव असत नाहीं. परंतु जेव्हां आपण असल्याचा आपणांस अनुभव होतो तेव्हां जग आणि ब्रह्म आहे असा प्रत्यक्ष अनुभव येतो. त्यावेळीं जीव म्हणजे आपण, सभोंवार पसरलेलें दृश्य, जग आणि पंचभूतांना आटोक्यांत ठेवणारी कोणी सत्ता या सत्तेलाच ईश्वर किंवा ब्रह्म म्हणतात असे अनुभवास येते. ह्यावेळीं जीव म्हणजे आपण आणि त्याचा अनुभव आयुष्य शब्दानें उल्लेखित केलेल्या कडेवरच संपतो. आयुष्य शब्दाची सुरवात "जन्म" शब्दानें आणि त्याची समाप्ति "मरण" शब्दानें होते. मरण शब्दाने आयुष्य उल्लेखाची शेवटची कडा ओलांडल्यावर पुढील अनुभव आयुष्य काळांत येत नाहीं. आपण असल्याचा अनुभव एकाएकीं होणें आणि त्याचवेळीं जग आणि ईश्वर असल्याचा उल्लेख होणें हाच मोठा विस्मयकारक प्रकार आहे. एकाएकीं हा अलभ्य लाभ आहे. मोठा गंमतीचा, कौतुकाचा, कुतूहलाचा, अतिगूढ, अतिखोल असा असूनही हा एक महाप्रसंगही आहे. कारण त्याचवेळीं जीवरक्षण भरण-पोषण, आणि आत्मप्रगति करण्याची फार मोठी जड अशी कामगिरी स्वत:वर येतें, आणि ती कांहीं केल्या टाळतां येण्यासारखी नाहीं. याकाळीं अन्न-खाणें हा धर्म अगदी गरजेनें पाळावा लागतो, येणारा अनुभव मुख्यतः अन्न खाण्यावर अवलंबून आहे असें वाटतें. अन्नाभावीं आपण मरतो कीं अनुभव पळून जातो हे नक्की कळत नाही; म्हणून येणाऱ्या अनुभवाचा अन्न ग्रहणाशीं अतिसंबध असल्यामुळें वर लिहिलेल्या विस्मय, कुतूहलाचा ठाव घेणें, कौतुक भोगणें याला व्यत्यय येतच राहतो. याचवेळीं एक शंका निर्माण होते कीं, आतां आपण खाल्लें नाहीं तर मरण येतें. परंतु सांप्रत अनुभव येईपर्यंत "मी खात होतो," "मी खाल्लें आहे" "मी खाणार आहे" असा कांहींच अनुभव नाहीं. असें असूनही "मी हयात होतो" आणि "मी हयात आहे" हा काय चमत्कार ? सांप्रत मी खाल्लें नाहींतर खात्रीनें मरतो असें भय वाटतें. इथेंच कांहीं तरी गूढ लपलेलें आहे हें निश्चित, इथें विचार करतांना आपण आणि आपले विचार एकमेकांशीं अनोळख होऊन जातात. पुन्हा आपली ओळख जाणवते तेव्हां आपण कसल्यातरी महासुखाचा अनुभव घेतला कीं काय असा भास होऊन बरें वाटतें.

## माणसाचा अविचार

आपण कोण ही शंका न घेतां अनेक मानवी जीवांचा जो व्यवहार चालतो, त्य. मानवी जीवाला फार दूरवरपासून परंपरेनें चालत आलेल्या वंशाचा इतिहास म्हणून माहिती दिली जाते. त्या माहितीच्या आधारानें नांव, कुळ, गोत, या रूढीपरंपरेचा अभिमान घेऊन मानवी प्राणी आपली आयुष्ययात्रा पुरी करतो. ह्याच काळांत रूढी आणि प्रसंग ह्यांच्याशीं लढा देत असतांना देवधर्म, दानपुण्य, रूढीने सांगितल्याप्रमाणें ईश्वरभजन इत्यादी कर्में तो करितो. तरीपण मरतांना त्याच्याकडून मरेपर्यंत, केलेल्या बऱ्या वाईट क्रिया ह्यांच्याबद्दल भय, आणि सुख म्हणजे बक्षिस आणि दंड अशी आस्था राहतेच, आणि अशी आस्था असतांनाच तो मरतो. वावरत असतांना आपणाकरितां आणि आपल्याकरितां म्हणून पदार्थ समृद्धि, धनदौलत, जमीन, घरेंदारें इत्यादी जें कांहीं मिळवितो त्याचे पुढें काय झालें हे कळावयाला त्याच्याशीं त्याचा पुन्हां केव्हांही परिचय घडत नाहीं. असें असूनहि मानवी प्राणी मरेपर्यंत स्वार्थानें हांव हांव करीत पदार्थ संग्रह गोळा करीतच असतो. ह्या काळांत परिचय असलेले लोक, आपण त्यांच्या उपयोगी पडलेला, ते आपल्या उपयोगी पडलेले, एकमेकांकरितां प्रसंगीं प्राणार्पण केलेलें वगैरेंचा जिव्हाळ्याचा प्रेमसंबंध पोसुनही मरणानंतर केव्हांही कधींही गांठीभेटींनें परिचय घडत नाहीं. असे असुनही मानवी प्राणी महास्वार्थानें आंधळेपणानें स्वार्थ साधित मरतो. एकाएकीं झालेला जगाचा परिचय केवळ कांहीं दिवसांच्या मुदतीचा आहे हें प्रत्येकाला कळत असतें. या क्षेत्राचा परिचयसुद्धां राहाणार नाही असें त्याला कळत असूनही, ह्या क्षेत्रांत आपली मोठी इस्टेट असावी अशा हेतूनें वावरत असतो. केवळ कांहीं दिवसांच्या परिचयानें तो एवढा लोभी आणि मोहित कां होतो याचा तो कधींही विचारच करीत नाहीं. याचा जर तो विचार करलि तर लोभ, मोह, ही भावना नाहींशीं होऊन सदा संतोषी, प्रेमळ, आनंदी, निर्मत्सर, निर्द्वेष राहील, आणि एकाएकीं अनुभवांत आलेला हा विश्वपरिचय, त्याच्यामुळें झालेला विस्मय, कौतुक यांच्याशीं समरस होऊन महाआल्हाद भोगील; परंतु तसें घडत नाहीं. आपल्या अनुभवापूर्वीच दीर्घ परंपरेनेंच हे जग चालत आलेलें आहे व ते खरें आहे अशी भावना दृढ धरून तो व्यवहार करीत असतो. आपल्या नजरेसमोर रोजच्यारोज जग घडतें आणि मोडतें हें तो पाहातो आहे, असें असूनही आपण करतो हा व्यवहार खरा आहे. आपण असा दिसतो हेंही खरें आहे, आणि आपण उभें असलेलें क्षेत्रही खरे आहे असा निश्चय घट्ट धरूनच तो व्यवहार करितो. परंतु अवघ्या एका क्षणानंतर याचा आपला कधीं काळीं कांहींही परिचय असणार नाहीं हें कधींसुद्धा विचारांत घेत नाहीं.

## विचार कुठून येतात

विचार उपजण्याची क्रिया कशी घडते ह्याच्याकडे जर लक्ष देऊं लागलों तर विचार उपजण्याचे थांबतात. तेवढ्या वेळांत तटस्थता येते, पुन्हां नकळतच विचार

चालू होतात. विचाराचें स्तंभन झालेलें असतें तो काळ सुखावह वाटतो. आपणासमोर किंवा आपणापासून विचार निर्माण होतात त्या विचाराला वडील आपणच असें वाटतें. त्या वडीलपणाचें स्वरूप लवकर न्याहाळता येत नाहीं. वरवर विचार करून तें न्याहाळलें जाणार पण नाहीं. विचाराला आपण वडील असून विचाराच्या उपयोगानें आपलें भरण पोषण आपण करितों. आपण आणि आपले विचार ह्याच्यायोगें सर्व व्यवहार चालतो हा काय चमत्कार आहे ! आपण आणि आपणांपासून उपजणारे विचार ह्याच्या आंतच जग सांठविलेलें आहे. आपणांजवळील विचारपरंपरा जेव्हां शांत झालेली असतें तेव्हां जणूं जग पण शांत झालेलें आहे असा अनुभव येतो.

जीव जेव्हां आत्मकेन्द्राचा विचार करूं लागतो तेव्हां त्याला सुखावह अवस्थेचें व्यसन लागतें. बहिर्गामीं पंचभौत्किक विषय आणि त्याचा पांच प्रकारानें होणारा भोग आणि त्याची देवघेव याच्यापासून चित्त अंतर्मुख होऊन विना विषयभोग आराम भोगूं लागतो. त्याचे चित्त बहिर्गामीं विषयावरून वळून जेव्हां अन्तर्याम पाहूं लागतें. तेव्हां बहिर्यामी पंच विषयभोग इतरेजनांकरितां मोकळे सोडून द्यावेत असे त्याला वाटूं लागतें, याच्या पूर्वील त्याचा अनुभव बहिर्गामी विषय कितीही भोगले तरी सेवन केलें असें स्मरण देऊन पुन्हां ' आ ' वासून पाहूं लागत होते, परंतु अन्तर्यामाकडे दृष्टी वळ-वल्यापासून त्यांची आवड कमी कमी होऊं लागते. बहिरंग सुखाची आवड कमी झाल्या-विना अन्तर्यामी सुखाचा स्वाद मिळत नाही. अन्तर्यामीं सुखाचा स्वाद मिळूं लागल्यावर बहिर्गामी सुखाचा स्वाद कमी होतो. त्यामुळेंच तो मनुष्यप्राण्यांशी सहज प्रेमळ, निम-त्सर, अल्पसंतोषी, लोकांचा उत्कर्ष पाहून समाधान भोगणारा, निष्कपटी, अनेकांचा स्नेही, निरापेक्ष अशा वृत्तीचा आपोआपच होतो. अन्तर्यामाचें सुख मिळूं लागल्यामुळें त्याला अति विरळ, पातळ, अशी स्वच्छ दृष्टि येऊं लागते. स्वसुखाच्या विस्मयानें, कौतुकानें तो प्रफुल्ल असतो. बहिर्यामीं लोकांच्या सुखाचा हेवादावा, धनमानाचा लोभ इत्यादि त्याला सुखदायी होतो. असा जोंपर्यंत अनुभव नसेल मग तो उत्तम बोलका जरी असला तरी स्वात्मसुखी नसतो. स्वात्मसुखी इतरांना पीडादायक असूं शकत नाहीं. त्याच्यापासून येणारा जगाना अनुभव तो पाहातो तिथेंच तो सुखी होतो.

---

—उठा, राष्ट्र-कार्याला वाहून घ्या. ज्याअर्थी तुम्ही मनुष्य म्हणून जन्माला आला त्याअर्थी तुमच्या जीवनाची कांहींतरी खूण मागें ठेवा. तुम्ही कांहींतरी हितकारक कृत्यें केलीं नाहींत तर तुमच्यांत व दगडात फरक तो काय ?

—तुमच्या राष्ट्राला आज विजयी वीरांची आवश्यकता आहे. यासाठी रणवीर व्हा. वज्र-शीलेसारखे ठाम उभे रहा. भारताच्या राष्ट्रीय नाड्या चेतविण्यास आज नवीन विद्युच्छक्ती हवी आहे. तरुणानो शूर व्हा. शूर व्हा. तुम्हाला उन्नतीकडे नेणारे प्रभावी विचारच तुमच्या अंतःकरणांत लहानपणापासून ठसले पाहिजेत.

# श्रेष्ठ रामभक्त श्री समर्थ रामदास

कृष्णातीरीं जांब नांवाचें एक गांव आहे. येथील कुलकर्णी मोठा भाविक, श्रद्धाळू व उदार होता. त्याची बायकोही आपल्या पतीला सुख देणारी असून ते दोघे नेहमी एकचित्त असत. तें जोडपें रामोपासक होतें. तो कुळकर्णी आपल्या घरी नऊ दिवस रामजयंतीचा उत्साह करून अन्नदान करीत असे. त्याच्या पोटीं पुत्र-संतान नसल्यामुळे त्याच्या कांतेला मोठे कष्ट वाटत. कांहीं दिवसांनीं त्यांची रामभक्ति फलद्रूप होऊन त्याला पुत्रप्राप्ती होण्याबद्दल दृष्टांत झाला. प्रत्यक्ष मारुती आपल्या उदरी अवतीर्ण होणार असे रामवचन कळतांच त्याची पत्नी हर्षभरीत झाली. रामचंद्रांनी सांगितल्याप्रमाणे त्यांना भक्ति, ज्ञान, वैराग्याने संपन्न असा सुलक्षणी पुत्र प्राप्त झाला. त्यांनी त्याचें नांव रामदास असें ठेवलें.

## सावधान कोणासाठीं

रामदास पांच वर्षांचा होतांच त्याचा व्रतबंध होऊन त्याला एका वैदिक ब्राह्मणाच्या हाताखाली पढावयास घातले. कांहीं वर्षे लोटल्यानंतर त्यांनी रामदासाचा विवाह ठरविला. वरपूजन, देवकप्रतिष्ठा, ब्राह्मणसंतर्पण, मधुपर्क वगैरे सर्व विधि होऊन लग्नाचा अंतःपट धरून ब्राह्मणांनी मंगलाष्टके म्हणण्यास सुरवात केली. द्विजमुखांतून निघणारा सावधान शब्द ऐकून रामदासाने पुरोहितास विचारलें, " तुम्ही सावधान शब्द कोणाला उद्देशून म्हणतां ? "

रामदासाच्या प्रश्नास त्या पुरोहिताने उत्तर केलें, " आम्ही हा शब्द तुला उद्देशूनच उच्चारीत आहों. कारण आजपासून तुझ्या पायांत संसारबिडी पडणार. हा संसार दुःखदायक आहे. यांत अणुमात्र सुख नाहीं. ज्यांनी संसाराचा स्वीकार केला ते सर्वप्रकारें अडचणींत पडले. एतदर्थ आम्ही सावधान म्हणून तुला सावध करीत आहों. "

पुरोहिताचें उत्तर ऐकतांच रामदास थरथर कांपूं लागला. त्याला वैराग्य उत्पन्न होऊन तो तसाच पळून अरण्यांत गेला. त्याची समजूत करून त्याला परत आणावें या हेतूने त्याचे आईबाप त्याच्या मागोमाग अरण्यांत गेले. रामदासाने त्यांना असे सांगितलें कीं, " दुःखरूप प्रपंचांत मला तुम्हीं गुंतवूं नका. कामाची हौस पुरविण्याकरतां सुंदर बायको केली म्हणजे तिचे पालन करण्यांतच देह राबवावा लागतो. श्रीमंतांचे गोडवे गाऊन धन मिळविले तरी त्याच्यावर घाला पडून त्यामुळें प्राणसंकट गुदरण्याचा संभव आहे. नलिकायंत्र पाहतांच आकाशांत उडून जाणाऱ्या शुकाप्रमाणें प्रपंचफासा दिसतांच मीं अरण्यवास स्वीकारला आहे. तुम्ही ममतेचा त्याग करून सुखाने घरीं परत जा. "

पुत्राच्या बोलण्यावरून तो मारुतीचा अवतार असल्याबद्दल पित्याची खात्री पटून तो घरीं परत गेला. त्यानें मायामोह सोडून दिला आणि रामदासासारख्या वीतरागी पुत्रामुळें आपला वंश पावन झाला असें मानून तो आपल्या पत्नीसमवेत रामभजन करीत राहिला.

## ाणसांपासून दूर

इकडे अरण्यांत रामदासानें असा विचार ठरविला कीं, तीर्थें व्रतें, अनुष्टानें हीं कालियुगांतील साधनें नसून केवळ नामसंकीर्तन हेंच एक साधन कलिकालांत बलवत्तर आहे. अशा समजुतीनें तो रामनामाच्या जपास लागला. त्यानें अन्न, पाणी वर्ज केलें. त्यानें आपल्या निष्टेचें निर्वाण मांडिलें. त्याची रामभक्ति पाहून श्रीमारुती प्रथम महा-भयानक रूपानें त्याच्यापुढें प्रगट झाले. मारुतीचें उग्ररूप पाहून रामदास मुळींच भ्याला नाहीं. समुद्रानें आपल्याच लाटा बुडविण्याचा यत्न केला तर तो कितीसा सफळ होणार ? आळशानें आकाशाला ग्रासण्याचा यत्न निष्फळ होतो तसाच मारुतीच्या उग्रतेचा प्रकार झाला. कारण रामदास हा त्याचाच अंश असल्यानें त्या भीमरूपास किमपि भ्याला नाहीं. तेव्हां मारुतीनीं आपलें सौम्य रूप दाखवून रामदासाला आलिंगन दिलें. त्यानें कबिराला रामदर्शनाचा मार्ग विचारिला. त्याला अभयवरदान देऊन हनुमान गुप्त झाले. नंतर रामदास गांवामध्यें जाऊन भिक्षा मागूं लागला. भिक्षेवर उदरनिर्वाह करून अरण्यामध्यें रामकीर्तन करण्यांतच रामदास रंगून गेला. अनुपाताच्या योगानें त्याच्यावर निद्रा व आळस यांची सत्ता चालेना. श्रोता, वक्ता, ज्ञानदाता सर्व काहीं आपलें मन आहे असें जाणून त्यानें मनास बोध करण्याकरितां दोनशेंपाच श्लोक रचिले. ते प्रसिद्धच आहेत. निर्जन वनामध्यें तो प्रेमभरांत कीर्तन करूं लागला म्हणजे त्याच्या नेत्रांतून प्रेमाश्रू गळूं लागत. अरण्यातील वृक्ष, पाषाण, श्वापदें यांनाच त्यानें आपले स्नेही मानिले. प्रापंचिक मनुष्यांच्या वाऱ्यालाही तो उभा राहत नसे. कस्तुरीचें पोतें क्षणभर हिंगामध्यें ठेविलें असतां त्याचें मोल नष्ट होतें त्याप्रमाणें परमार्थप्राप्तीकरितां विरक्तता धरणाराला प्रापंचिकाची संगत बाधक होते अशा समजुतीनें तो अविद्येनें वेष्टिलेल्या जनांची केव्हांही संगत करीत नसे. तो रामाकरितां भजन करी. इतर जनांची करमणूक करून भजनाच्या साधनानें त्याला लौकीक जोडावयाचा नसल्यानें तो जगाविषयीं अगदीं बेफिकीर होता. तो विदेही होऊन सर्वकाळ नामस्मरणांत गढलेला असे.

## रामचंद्राला हांक

एका आषाढी यात्रेच्या प्रसंगीं रामदासाला पंढरपुरामध्यें श्रीरामचंद्र दृष्टीस पडतील असा दृष्टांत झाला. त्यावर भरवंसा धरून रामदास पंढरीच्या यात्रेस गेला. त्या ठिकाणीं टाळ, मृदंग वाजवून वैष्णव लोक आनंदानें गाऊन नाचत होते. रामदासास तो प्रकार पाहून कसेसेंच वाटलें. पुढें त्याच्या दृष्टीस चंद्रभागा पडलीं तेव्हां तर त्याचें चित्त संश-यानें अगदीं ग्रस्त झालें. आपण ज्या रामाचें ध्यान करितो त्याच्या वास्तव्याचीं कांहींच चिन्हें न दिसल्यानें चित्तविक्षेप होऊन तो रामभजन करूं लागला. मुखानें रामचरित्र

गात गात तो गरुड पाराजवळ आला तों त्याला अवचित् मारुतीचें दर्शन झालें. मारुतीला नमस्कार करून त्यानें पुढें दृष्टी टाकिली तों संतसाधूंचें कीर्तन पाहून त्याला कांहींसा आनंद वाटला. हरिदासाला नमस्कार करून तो दर्शनाकरितां आणखी पुढें गेला; तों त्या ठिकाणीं विटेवर उभी राहिलेली पांडुरंगाची मूर्ति पाहून त्यानें दर्शन घेण्याचें प्रेम सोडिलें. आपण ज्या स्वरूपाची मानसपूजा करितों तें रामस्वरूप त्या ठिकाणीं दिसत नाहींसें पाहून तो विठोबासन्मुख उभा राहून बोलला कीं, " देवा, तूं आपल्या हातांतील चाप व बाण काय केलेस ? हे श्रीरामा, कटावर दोन्ही कर ठेवून तूं आपल्या रूपांत असा पालट काय म्हणून केला आहेस ? देवा तूं माझ्याशीं बोलत कां नाहींस ? अशा या अबोल्याचें कारण काय ? शरयूच्या जागीं ही भीमरथी वाहत असण्याचें कारण काय ? अयोध्या नगरीचा लोप होऊन तिच्या जागींच हें पंढरीक्षेत्र वसलें काय ? सीतादेवीचा त्याग करून तूं या चार कांता कोठून आणिल्या आहेस ? असंख्य वानरांतून एका मारुती खेरीज येथें कोणीच दिसत नाहीं यावरून तो मारुती वानरसैन्यांतून फितुर झाला काय ? माझ्या रामावांचून मी आलिंगन कोणास द्यावें ? मी साष्टांग प्रणिपात कोणापुढें घालावा ? हे आयोध्यावासी श्रीरामा, मी तुझा रामदास तुझ्यावांचून अनाथ आहे. मला त्वरित दर्शन दे. "

इतकी प्रार्थना करीत असतां त्याचे नेत्र सजल झाले. त्याचा कंठ सद्गदित झाला. त्याची ती प्रेमळ अवस्था पहातांच पांडुरंगानीं रामरूप धारण केलें. रुक्मिणी-मातेनें सीताबाईचें रूप घेतलें. तीं रूपें पहातांच रामदासाला धन्यता वाटली. त्यानें रामचंद्राच्या चरणाला मिठी मारिली. त्या समयीं प्रभूनीं रामदासाला आज्ञा केली कीं, " माझें हें रूप ध्यानांत आणून आतां द्वैतखंडण कर. शिष्यसांप्रदायी मिळवून माझें कीर्तन करून जडमूढ माझ्या भजनी लागतील असें कर. " अशी आज्ञा देवांनीं आपलें पूर्वरूप धारण केलें, परमात्म्याच्या बोधाप्रमाणें रामदासानें द्वैताचा त्याग करून पांडुरंगमूर्तीस वंदन केलें. रामकृष्ण स्वरूपाविषयींचें द्वैत निरसन होतांच तो कीर्तन करूं लागला. गोपालकाला उरकून देवाचा निरोप घेतल्यानंतर रामदास तेथून निघाला.

आपल्या आश्रमाकडे रामदास परत येत असतां वाटेनें तो जेजुरीस आला. रामाच्याच ठिकाणीं अनन्यभाव ठेवणारा रामदास आपल्या दर्शनाला येणार नाहीं असें जाणून जेजुरींतील म्हाळसाकांत शिवाजीचें रूप घेऊन आपण होऊनच त्याच्या दर्शनास चालून गेले. मल्हारीने रामदासाचें चरण धरून सांगितलें, " रामभक्तांवर माझा फार लोभ आहे. आपण पंढरीस जातांना मला नेहमीं दर्शन देत जावें अशी इच्छा आहे. मी गडावर राहून आज कित्येक दिवस तुमच्या भेटीची इच्छा करीत आहें. "


मार्तंडाच्या भाषणावर कांहीं शब्द बोलावे या विचारानें रामदास कांहीं बोलणें काढणार तो तों शिववाजीरूपीं मल्हारी अदृश्य झाला. हा अद्भूत प्रकार घडतांच

रामदासानें विवेक दृष्टीनें पाहिलें तो त्याला म्हाळसाकांताच्या आगमनाची कल्पना झाली. तेव्हां सद्गदित होऊन तो गडावर जाऊन मणिमल्लमर्दनाचें दर्शन करून परत आला. त्या समयीं त्यानें मल्हारीची रचलेली आरती प्रसिद्धच आहे.

## रामदासांचा दासबोध

नंतर रामदास आपल्या गांवीं परत गेले. त्यांचा हा सर्व लौकिक शिवाजीच्या कानावर जाऊन तो शरण गेला. त्याचा अधिकार लक्षांत आणून रामदासांनीं त्याला उपदेश दिला. आणखीही कित्येक शिष्य निर्मून त्यांनीं अज्ञजनांना भक्तिमार्गास लाविलें.

रामदासांनीं अवाढव्य शिष्यशाखा उभारिली. अनेक अद्भुत चमत्कार दाखवून नास्तिक मताचा पाडाव केला तरी ते आपल्या उदासीन भक्तियोगापासून तिळमात्र ढळले नाहींत. मानापमान, रंक आणि राव यांच्या ठिकाणीं त्यांचा भाव समसमान असे. रामदासांचें अध्यात्मज्ञान अद्भूत होतें. अनुभवाच्या गाळींव प्रमेयांनीं ओथंबलेला असा दासबोध नांवाचा ग्रंथ रामदासानींच रचिला. पुष्कळ लोक आपल्या हौसेच्या भरांत दासबोधाला राजकीय ग्रंथ म्हणून प्रशंसनीय मानतात, पण ही गोष्ट सर्वथैव मिथ्या आहे. छत्रपती शिवाजी हा त्यांचा छात्र असल्या कारणानें त्यांच्या-संबंधानें त्यामध्यें कांहीं राजकारण व राजनीति प्रतिपादिली आहे. परंतु तें त्या ग्रंथाचें अंतरंग नव्हे. वस्तुतः तो अध्यात्म ग्रंथ आहे. त्याचें एखाद्या बुद्धिमंदानें सदभाव धरून सारखें वाचन केलें तर तो निःसंशये करून मोठा ज्ञानवान् पंडित होईल. इतकेंच नव्हे तर भक्तिभावाच्या कासेला लागून तो ग्रंथ श्रवण करणारास जीवन्मुक्तिही प्राप्त होईल. विश्वोद्धार करण्याकरितां ज्यांनीं भूतलावर अवतार धारण केला त्यांच्या ग्रंथांचें मुख्य अंग जर सिद्धांतज्ञान व अध्यात्म नसेल तर अवताराची सार्थकता मुळींच रहाणार नाहीं.



श्रेष्ठ प्रतीचीं
जी. बी. फाऊंटनपेन
इंक नेहमीं वापरा.
जी. बी. विचारे आणि कं.,
लायब्ररी रोड, दादर–मुंबई २८.

# साक्षात्कार दर्शनाचा इतिहास

—गुरुदेव रानडे

ख्रिस्ती शतकाच्या आरंभापासून तों तहत् एक हजार वर्षांपर्यंत समकालीन असलेल्या गूढशास्त्र व अनुभवशास्त्र अशा दोन विचारप्रणालिकांचा विचार करतां त्या दोहोंशीं समान अशी तिसरी एक विचार प्रणालिका आहे. तिला आपण तत्वज्ञानात्मक किंवा दर्शनात्मक प्रणालिका म्हणूं. श्रीशंकराचार्य, श्रीरामानुजाचार्य, श्रीमध्वाचार्य व श्रीवल्लभाचार्य हे चार आचार्यश्रेष्ठ या चार प्रकारच्या विचारप्रणालिकांचे मुख्य प्रतिनिधी आहेत हें आम्हीं भारतीय तत्वज्ञानाच्या इतिहासावरील आमच्या ग्रंथमालेंतील एका ग्रंथांत सांगितलेंच आहे. श्रीशंकराचार्यांचें तत्वज्ञान भक्तिवादाविरुद्ध व म्हणून अनाध्यात्मिक आहे असें किस्येकांचे मत आहे. परंतु, श्रीशंकराचार्यांनीं भक्तीची उपेक्षा न करतां तिचा समावेश आपल्या अद्वैत दर्शनांत केला ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. अनुभूति हें जर श्रीशंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानाचें ध्येय नाहीं, तर "शांकर" मत आहे तरी काय हेंच आम्हांस समजत नाहीं! श्रीरामानुज, श्रीमध्व व श्रीवल्लभ या तिघांहि आचार्यांनीं तीन प्रमुख दर्शनें निर्माण केलीं व पंधराव्या शतकाच्या अखेरपर्यंत या आचार्यत्रयीच्या विचारांचा अंमल लोकांच्या मनावर होता. त तिघेहि श्रीशंकराचार्यांच्या मायावादाविरुद्ध होते ही गोष्ट खरी आहे. या तिघांनींहि वेदान्त विचारास भक्ति कशी अत्यावश्यक आहे हें दाखविलें आणि वल्लभाचार्यांनीं तात्त्विक अद्वैतवाद प्रतिपादिला तरी एकेश्वर-वाद व सर्वेश्वरवाद यांचा समन्वय अनुभूतींत कसा होतो, हें श्रीरामानुज व श्रीमध्वाचार्य यांना समजलें नाहीं असें दिसतें. ईश्वर एक आहे किंवा हें सर्व ईश्वरमय आहे असें मत प्रतिपादणाऱ्यांना अध्यात्मशास्त्राची समन्वयी वृत्ति म्हणजे काय हे कळत नाहीं असें म्हणावें लागतें. तेराव्या शतकानंतर हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत श्रीरामानुज, श्रीमध्व, व श्रीवल्लभ आचार्यांच्या मतांतून अनेक महत्त्वाचे भक्तिपंथ निर्माण झाले. श्रीरामानुजांच्या मताचा प्रसार त्यांच्या जन्मभूमींत फारसा झाला नाही. परंतु, उत्तर हिंदुस्थानांत मात्र त्याचा प्रसार फार जोरांत झाला ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. रामानंद हा रामानुजसंप्रदायी असून तो आपल्या गुरूबरोबर भांडला व काशीस येऊन राहिला. त्याच्यापासून तीन प्रसिद्ध अनुभूतिपंथ निघाले. तुळसीदासपंथ, कबीरपंथ व नाभाजीपंथ हे ते तीन पंथ होत. कबीरांवर सुफी तत्त्वज्ञानाचाहि थोडाफार परिणाम झाला होता. तुलसीदासांच्या मनावर ऐतिहासिक व पौराणिक रामकथांचा फार मोठा परिणाम झाला होता. हिंदी वाङ्मयांतील संतश्रेष्ठांची चरित्रें लिहिण्याचे काम नाभाजीनें पत्करलें. मध्वमतामुळें बंगाली संतश्रेष्ठ श्रीचैतन्य उदयास आले. त्यांच्या मनावर तत्पूर्वकालीन प्रसिद्ध चंडीदास, विद्यापति इत्यादि

बंगाली संतांच्या विचार–प्रणालिकेचा परिणाम झाला होता, श्रीवल्लभाचार्यांच्या मताचा प्रभाव गुजराथेत जास्त पडला व त्यांच्या शिकवणीमुळे मीराबाई व नरसी मेहता हे संतश्रेष्ठ प्रसिद्धीस आले. याप्रमाणें तत्त्वज्ञानात्मक वादांतून अर्वाचीन समाजनिष्ठ किंवा लोकशाही ( Democratic ) अध्यात्मशास्त्र निर्माण झालें. अध्यात्मशास्त्राची शिकवण त्या त्या प्रांतातील मातृभाषेंतून देण्यांत आली हा या शास्त्राचा विशेष आहे. याविरुद्ध व्यक्तिनिष्ठ ( Indivaidualistic ) अनुभूतिशास्त्राची स्थिति होती. आध्यात्मिक विचार प्रदर्शित करावयाचे झाल्यास संस्कृत भाषाच वापरली पाहिजे असा या प्राचीन अध्यात्मशास्त्राचा कटाक्ष होता. केवळ भाषेच्या बाबतींतच नव्हे तर मूलभूत तत्त्वांच्या शिकवणुकीच्या बाबतींतहि अर्वाचीन अध्यात्मशास्त्र लोकमतानुवर्ती असल्यामुळें हें शास्त्र सर्वांच्या मालकीचें कसें झालें हें आपण पाहिलेंच आहे. यावरून हिंदी, बंगाली व गुजराती अध्यात्मवाङ्मयावर अनुक्रमें श्रीरामानुज, श्रीमध्व व श्रीवल्लभ या तीन मोठ्या संप्रदायांचा ठसा कसा उमटला आहे हें त्या त्या वाङ्मयाच्या वाचकांस सहज पाहावयास मिळतें.

## ख्रिस्ती विचाराचा भक्तिपंथावर परिणाम.

भारतीय भक्तिपंथावर व विचारांवर ख्रिस्ती विचारांचा कितपत परिणाम झाला असेल या प्रश्नाचा आतां आपण विंचार करू. यासंबंधीं लेखकवर्गात तीव्र मतभेद आहेत. हिंदी भक्तिपंथांचा उगम परराष्ट्रांपासून झाला असें एक मत आहे. भक्ति करण्याची प्रवृत्ति हिंदू लोकांत असंभाव्य होती व म्हणून त्यांच्यामध्यें जी थोडीबहुत भक्ति उत्पन्न झाली ती इतर राष्ट्रांतूनच आली असली पाहिजे असं कांहीं तज्ज्ञांचें मत आहे. भक्तिमार्ग मूलतः हिंदूंना परका नसला, तरी पुढे त्यांत जी प्रगति झाली ती विशेषतः बाल–ईश्वर ( Child–Good ) व त्याची पूजा या ख्रिस्ती कल्पनांच्या प्रभावामुळे झाली असे मानले, हे इतर कांहीं इंग्रजी ग्रंथकारांचें मत आहे. या मताप्रमाणे श्रीरामानुज व श्रीमध्वाचार्य यांच्यावर ख्रिस्ती आचार–विचारांचा परिणाम झाला असला पाहिजे असें दिसतें. कारण ते जन्मले त्या प्रांतांत ख्रिस्ती मताचें विशेष प्राबल्य होतें असें हें लेखक गृहीत धरतात. भारतीय भक्तिमार्ग पूर्णतया भारतीयच आहे असें तिसरें एक मत आहे. श्रीरामानुजाचार्य किंवा मध्वाचार्य यांच्या मनावर ख्रिस्ती मताचा थोडाफार परिणाम झाला होता हें या मतवाद्यांस मुळींच मान्य नाहीं. भक्तिमार्ग मूळचा ख्रिस्ती आहे, हें मत तर त्यांना मुतराम् मान्य नाहीं. परंतु आज विसाव्या शतकांत मात्र कांहीं विशिष्ट परिस्थितींत हिंदी व ख्रिस्ती आचार–बिचारांचा एकमेकांवर परिणाम होणें शक्य आहे, ही गोष्ट यांना अमान्य नाहीं. सद्गुरुंचें महत्त्व, ईश्वरनामाचा महिमा, श्रद्धा व कर्म, किंवा नियति आणि प्रसाद यांतील विरोध इत्यादि कांहीं महत्त्वाच्या विषयांत हिंदी व ख्रिस्ती मतांचें जें ऐक्य दिसून येतें त्याचें कारण बाह्य स्थितीचा परिणाम नसून, त्यांच्या स्वतंत्र अंतगर्त विचारांची वाट हेंच होय, असें हे मतवादी मानतात. कनौजचा राजा

शिलादित्य यानें इ. स. ६३९ सालीं कांहीं सीरियन् ख्रिस्ती लोकांचें स्वागत केलें म्हणून किंवा अकबरानें आपल्या कारकीर्दीत कांहीं जेझुइट् मिशनऱ्यांना आपल्या राज्यांत येऊं दिलें म्हणून कबीर किंवा तुलसीदास यांच्या विचारसरणीवर ख्रिस्ती मताचा प्रभाव पडला, हें मत त्यांना मान्य नाहीं "वैकुंठीचे राणिवे" [स्वर्गांतील देवाचें राज्ज] हा शब्दप्रयोग श्रीज्ञानेश्वरींत योजिला आहे. एवढ्यावरूनच प्रत्यक्ष श्रीज्ञानेश्वरावरहि ख्रिस्ती मताचा पगडा होता, असेंहि मत एकदां प्रतिपादण्यांत आलें होतें! श्रीतुकाराम महाराजांनीं मनुष्याची पापवृत्ति मोठी जबर आहे या गोष्टीवर जोर दिला म्हणुन त्यांच्या विचारसरणीवरहि ख्रिस्ती मताचा प्रभाव पडला असावा, अशा प्रकारचीं मतें जितकीं अशक्य वाटतात, तितकेंच वरील मतहि अशक्य आहे असें आम्हांस वाटतें. मानवी प्राणी जन्मास आला तेव्हांपासून व पुढें त्याच्या प्रगतिपथावरील प्रत्येक स्थितींत भक्ति किंवा प्रेमवृत्ति ही थोड्याफार प्रमाणांत सदैव जागृत होती, तशीच ती मानव्याच्या आतांपर्यंत कायम रहाणार! म्हणून भिन्नपंथी लोक एकत्र आले व विशेषतः त्यांचा संबंध दीर्घकाल टिकला, म्हणून एकमेकांविषयीं सहानुभूति वाटून एकमेकांचे रीतिरिवाज समजून घेण्याची व स्वीकारण्याची इच्छा झाली, तर त्यांचा एकमेकांवर थोडाबहुत परिणाम खास होणार ही गोष्ट नाकबूल केली नाहीं, तरी भक्ति ही वृत्ति सर्व जातींत सहज स्फुरते ही गोष्टहि तितकीच खरी आहे, हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

## तामीळ अध्यात्मशास्त्र.

तामीळ अद्भुभूति शास्त्राचा आरंभ व ख्रिस्ती मत यांचा परस्पर कांहींच संबंध नाहीं, हें उघड्या डोळ्यांनीं पहाणाऱ्या कोणासहि सहज दिसून येईल. श्रीरामानुजाचार्यांपूर्वीं कित्येक शतकें तामीळ प्रांतांत शैव व वैष्णव भक्त होऊन गेले यावरून त्यांचा ईश्वरविषयक भक्तिभाव अगदीं उपजत व निसर्गसिद्ध होता. त्यावर कोणत्यांहि परकी विचाराचा किंवा आचाराचा परिणाम मुळी झाला नव्हता. तामीळ शिवभक्त ख्रिस्ती शकाच्या सहाव्या शतकांत या देशांत राहावयास आले व कायमचे रहिवासी झाले. त्यांनीं जी दीर्घ संतपरंपरा निर्माण केली तीवरूनहि ईश्वरविषयक भक्ति ही मानवी अंतःकरणांत स्वयंस्फूर्त असते ही गोष्ट उघड दिसते. ख्रिस्ती सनाच्या सातव्या शतकांत प्रसिद्धीस आलेले निरुज्ञासंबंधनर व अप्पर, आठव्या शतकांत लोकप्रिय झालेला तिरुमूलेर व नवव्या शतकांत सर्वतोमुखीं गाजलेला मणिक्कवाचगर, हे शैव, संत म्हणजे तामीळ वाङ्मयांतील तेजस्वी हिरे होत. माणिक्कावाचगरचीं वचनें सोन्याप्रमाणें बहुमोल असून, तो वस्तुतः सर्व शैव संतांचा शिरोमणि शोभतो, असें म्हणावयास मुळींच हरकत नाहीं. त्याच्या अंतःकरणांत परमेश्वराविषयीं भक्ति सहज स्फूर्त झाली. पुढें स्वतःच्या दोषदर्शनामुळें ती भक्ति तीव्रतर होऊन क्रमाक्रमानें त्यास सानुभव ईश्वरज्ञान झालें. प्रथम ईश्वरी साक्षात्काराचा अनुभव आल्यावर आपणास कसा आनंद व हर्ष झाला; पुढें श्रद्धा कशी डळमळं

लागली; त्यामुळें स्वतःचे दोष जास्त स्पष्ट व तीव्रपणें कसे दिसूं लागले; अंतिम ध्येय गांठतां येईल किंवा नाहीं याविषयीं निराशा कशी वाटूं लागली; स्वतःबद्दल अत्यंत शरम कशी वाटूं लागली; परंतु, पुढें एकदम नवीन व श्रेष्ठ अनुभवानें पुनः कशी उमेद वाटूं लागली; आणि शेवटी परमार्थाचें अंतिम ध्येय साधण्यांत यश कसें मिळालें---या सर्व स्थित्यंतरांचें माणिक्कवाचगरनें अत्यंत सुरस वर्णन आपल्या महाकाव्यांत दिलें आहे. तामीळ वैष्णव म्हणजे महानुभवी अलवार होत. ही एक स्वतंत्र संतपरंपरा असून विष्णुभक्तीनें देवाची प्राप्ति कशी होते हें या संतांनीं फार स्पष्ट शब्दांत सांगितले आहे. अलवारांचा काल म्हणजे कल्पनातीत प्राचीन मानण्यांत येतो. तथापि, ते देखील तामीळ शैवांप्रमाणे इ. स. च्या सहाव्या शतकांत या देशांत कायम राहू लागले असावेत यांत शंका नाहीं. या टीकाकारांच्या मतें नामलवार हा संत आठव्या किंवा दहाव्या शतकांत जन्मला असवा. त्यानें लिहिलेले ग्रंथ सर्व तामीळ प्रांतांत वेदाप्रमाणें पूज्य मानितात. त्याचा शिष्य नाथमुनी. याचा जन्म दहाव्या शतकांत झाला असावा. त्यानें अलवार संतांच्या चार हजार भक्तिपर कविता संग्रहित केल्या. नाथमुनींचा नातू म्हणजे सुप्रसिद्ध यामुनाचार्य होय. हा इसवीसन १०५० च्या सुमारास प्रसिद्धीस आला. त्याचे परंपरागत शिष्य म्हणजे श्रीरामानुजाचार्य होत. हे इ. स. १०५० सालीं जन्मले व इ. स. ११३५ सालीं यांनीं आपली इहलोकची यात्रा संपविली. याप्रमाणे श्रीरामानुजाचार्यांच्या कालापर्यंतचा हा तामीळ शैव व वैष्णव संतपरंपरेचा संक्षिप्त इतिहास आहे. श्रीरामानुजाचार्यांना आपल्या विचारांची स्फूर्ति या वैष्णव संप्रदायापासून मिळाली. यावर त्यांनीं जी विशिष्टाद्वैताची उभारणी केली ती द्वैत व अद्वैत या दोन्ही दर्शनांसारखीच मारक ठरली. श्रीचामानुजाचार्यांच्या पूर्वीच्या संतांना तत्त्वज्ञानापेक्षां भक्ति जास्त प्रिय होती. ईश्वरप्राप्तीसाठी प्रयत्न करणाऱ्या साधकाचें शुद्ध प्रेम तात्त्विक विचाराने अ-कलंकित राहते व त्याच्यावर तात्तिक विचाराचा कांहींहि परिणाम होत नाहीं हें त्यांनीं स्पष्ट दाखवून दिलें.

या संतांची आम्ही केलेली स्तुति पूर्ण निर्दोष आहे असे आमचे म्हणणे नाहीं. कारण राधाकृष्णपंथाचा या श्रेष्ठ वैष्णव संतांच्या लिखाणावर कसा परिणाम झाला हें सर्वांस माहीत आहेच. पति--पत्नीचें नातें म्हणजे ईश्वरभक्तांच्या नात्याचें प्रतीक आहे ही कल्पना या वाङ्मयांत बऱ्याच मोठ्या प्रमाणांत ग्रंथित केले आहे. व त्या प्रमाणांत हें वाङ्मय दूषित झालें आहे असें आम्हांस वाटतें. वीरशैव अध्यात्म-वाङ्मयाची गोष्ट मात्र अगदीं याच्याविरुद्ध आहे. तें वाङ्मय निर्भीड व कणखर आहे, कारण त्यानें एकीकडे पूर्ण अद्वैत तत्त्वज्ञानाशीं, तर दुसरीकडे कडक नीतिशास्त्राशीं निकट संबंध जोडला आहे. यांतील बऱ्याच भागांत विविध आत्मलिंगांच्या स्वरूपाविषयीं काल्पनिक चर्चा केली आहे. हीं लिंगें म्हणजे मानसशास्त्रविषयक सूक्ष्म कल्पना होत. या वाङ्मयांतील तत्त्वज्ञान काळजीपूर्वक अभ्यासण्यासारखें आहे. बसव हा एक मोठा समाज-

सुधारक होता. तेराव्या शतकाच्या आरंभीं त्याचा जन्म झाला असावा. मलप्रभा व कृष्णानदीचा संगम होतो त्या ठिकाणीं संगमेश्वराचें देऊळ आहे. या संगमेश्वराचा तो भक्त होता. त्याच्यापूर्वीं अनेक सिद्धपुरुष प्रसिद्ध होऊन गेले. हे सिद्ध हिंदी वाङ्मयांतील नाथांइतके किंवा तामीळ वाङ्मयांतील अलवारांइतकेच प्राचीन होते. निजगुणशिवयोगी यांच्यामध्यें संतांच्या गुणांपेक्षां तत्त्वज्ञाचे गुण जास्त होते. अखंडेश्वरांमध्यें अनुभूतीपेक्षां नीतीचें प्राधान्य जास्त होतें. सर्पभूषणांत नीति किंवा तत्त्वज्ञानापेक्षा अनुभूति जास्त प्रमाणांत आहे व हे श्रीज्ञानेश्वरांच्या योग्यतेचे संतश्रेष्ठ आहेत. लिंगायत वाङ्मयांतील हे फार मोठे व नांवाजलेले संत आहेत. हीन जातींत जन्म झाल्यामुळें कनकदास हा एकाद्या शिलेदारासारखा दिसतो. पुरंदरदास, जगन्नाथदास, विजयदास इत्यादि दासकूटांतील वैष्णव संतांनीं कर्नाटकांतील वैष्णव संप्रदायाची उन्नति केली असें मानण्यास मुळींच हरकत नाहीं. ही वाढ वीरशैव संप्रदायाच्या वाढीबरोबर एकाच काळीं झाली असावी. हे सर्व फार मोठे व प्रसिद्ध आत्मज्ञ होते व त्यांच्या ग्रंथांची व विचारांची चर्चा पुढील एका ग्रंथांत करण्याचा आमचा मानस आहे.

श्रीज्ञानेश्वरकालापासून तों तहत रामदासाच्या कालापर्यंत—म्हणजे वस्तुतः तेराव्या शतकापासून सतराव्या शतकाच्या अखेरपर्यंत प्रसिद्धीस आलेल्या महाराष्ट्रसंतांच्या शिकवणुकीचा विचार या ग्रंथांत कर्तव्य आहे. अठरा व एकोणिसाव्या शतकांतील भारतीय तत्त्वज्ञानाच्या विकासाचा विचार या ग्रंथ—मालेच्या शेवटच्या ग्रंथांत करण्यांत येईल. या ग्रंथाचा विस्तार मर्यादेबाहेर जाईल या भीतीनें भारतीय अनेक संतसमाजांपैकी एका लहान विभागाचा म्हणजे महाराष्ट्रीय संतांचाच विचार येथें केला आहे. महाराष्ट्रांतील संतपरंपरेचा आरंभ श्रीज्ञानेश्वरांनीं मोठ्या संयमानें व परिणामकारक रीतीनें केला. त्यांचे वडील काशीचे श्रीपादरामानंद किंवा प्रत्यक्ष रामानंद, यांचे शिष्य होते अशी समजूत आहे. ही समजूत खरी असेल तर रामानंदरूपी गिरिशिखरावरून कबीर व तुलसीदास हे दोनच अनुभूति—प्रवाह वाहत नसून, एकाप्रकारें महाराष्ट्रांतील अनुभूतिप्रवाहहि याच शिखरांतून उगम पावले ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. हा समज खरा असो वा खोटा असो, श्रीनिवृत्ति व श्रीज्ञानेश्वर हे गहिनीनाथांच्या अध्यात्मपरंपरेंत येतात, ही गोष्ट मात्र अगदीं निश्चित आहे. कारण ही गोष्ट श्रीनिवृत्ति व श्रीज्ञानेश्वर या दोघांनींहि आपल्या लिखाणांत अनेक वेळां स्पष्टपणें नमूद केली आहे. श्रीनिवृत्तिनाथांना गहिनीनाथांकडून व गहिनीनाथांना गोरक्षनाथांकडून व गोरक्षनाथांस मत्स्येंद्रनाथांकडून हें ज्ञान प्राप्त झालें, यात्री येथें पुनरुक्ति करण्याची जरुरी नाहीं. त्यांचा हा नाथ—संप्रदाय होता. मत्स्येंद्रनाथ व गोरक्षनाथ कोठें जन्मले, केव्हां व कसे प्रसिद्धीस प्रसिद्धीस आले हें ठरविणें अशक्यप्राय आहे. परंतु, हीं नांवें अनैतिहासिक नाहींत हें उघड आहे. मत्स्येंद्रनाथांपूर्वीं पौराणिक दंतकथा व त्यांच्यानंतर इतिहास, अशी वस्तुस्थिती आहे. श्रीज्ञानेश्वर या श्रेष्ठ नाथ—संप्रादायाचे अनुयायी होते व तामीळ प्रांतांतील

अलवारांप्रमाणें किंवा लिंगायत ज्ञातींतील सिद्धांप्रमाणें या नाथांनी आपला प्रतिनिधी श्रीज्ञानेश्वर, यांच्या हस्तें महाराष्ट्रांत अनुभूतिशास्त्राचा पाया यशस्वीपणें घातला, ही गोष्ट सुस्पष्ट आहे. परमार्थ मंदिराचा पाया श्रीज्ञानेश्वरांनीं घातला, त्यावर श्रीनामदेव व इतर संतांनीं दिव्य मंदिर उभारलें. श्रीतुकाराम त्याचा कळस झाला, असें पुढें अनेक संतांनी जे वर्णन केलें आहे तें निष्कारण व निरर्थक नाहीं. श्रीज्ञानेश्वरापासून नामदेवापर्यंत, श्रीनामदेवापासून एकनाथ व एकनाथापासून श्रीतुकारामापर्यंत ही परंपरा अखंड व अत्रुटित राहिली. ग्रीक तत्त्ववेत्ता हिरॅक्लायटस्प्रमाणें श्रीरामदास कांहींसें एकाकी, अलग व स्वतंत्र दिसतात. त्यांचा संप्रदाय अगदीं नवीन आहे. त्यांचा वारकारी संप्रदाय नव्हे. म्हणूनच वारकरी श्रीरामदासांच्या अध्यात्मग्रंथांकडे जरा साशंक दृष्टीनेंच पाहातात. कोणत्याच संप्रदायाचा आम्हांस अभिनिवेश नाहीं व मधमाशांप्रमाणें सांपडेल तेथून-अध्यात्ममधु गोळा करावयाचा हा आमचा मुख्य उद्देश आहे. म्हणून आम्हांस अध्यात्मदृष्ट्या वारकरी व धारकरी, टाळ–सांप्रदाय व तरवार–संप्रदाय या दोहोंमध्यें कांहींच भेद दिसत नाहीं. श्रीनामदेव हे श्रीज्ञानेश्वराचे समकालीन होते व श्रीज्ञानेश्वरानंतर कांहीं दिवस ते राहिले. गोरा कुंभारानें थापटीनें परीक्षा करून त्यांस कच्चें मडकें ठरविल्यामुळें, त्यांनी विसोबा खेचर यांजकडून उपदेश घेतला व ते या अध्यात्मपरंपरेत शिरले. विसोबा हे सोपानदेवाचे शिष्य, व सोपान निवृत्तिनाथांचा शिष्य. एकनाथास श्रीजनार्दनस्वामींकडून परमार्थाचा उपदेश मिळाला व जनार्दनस्वामींना दत्ताचे अवतार श्रीनृसिंहसरस्वति यांजकडून अनुग्रह झाला. एकनाथ हे भानुदासांचे पणतू होत व भानुदास हे पंढरीचे मोठे वारकरी होते. शिवाय श्रीज्ञानेश्वरपरंपरेकडून आपणांस आत्मज्ञान मिळालें असें स्वतः एकनाथांनीं सांगितलें आहे. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां, एकनाथ श्रीज्ञानेश्वर परंपरेहून निराळे आहेत असें म्हणतां येणार नाहीं. मराठी संतांमध्यें सर्वांत जास्त श्रेष्ठ संत म्हणजे तुकाराम होत. चैतन्यांची एक शाखा म्हणजे त्यांची गुरुपरंपरा होय. या चैतन्य शाखेचा बंगाली चैतन्य–परंपरेशीं काय संबंध आहे याचा अद्यापि शोध लागला नाहीं. परंतु कांहीं झालें तरी श्रीज्ञानदेव, श्रीनामदेव, व श्रीएकनाथ यांच्या ग्रंथांचा सतत अभ्यास करून वारकरी संप्रदाय श्रीतुकारामांनीं वाढीस लावला ही गोष्ट सुस्पष्ट आहे. परमार्थाच्या बाबतींत श्रीरामदासांचा यांपैकीं कोणाशींच फारसा संबंध आला नाहीं. लहानपणीं रामदासास व त्याच्या भावास श्रीएकनाथाकडे नेलें होतें, तेव्हां 'हे मोठे प्रसिद्ध संत होतील' असें श्रीएकनाथांनीं भाकित केलें होतें, अशी एक आख्यायिका आहे. याचप्रमाणें शिवाजीमहाराजांनीं श्रीतुकारामबुवांना आपणास उपदेश द्या म्हणून विनंति केली असतां त्यांनीं शिवाजीमहाराजांस श्रीरामदासाकडे पाठविलें, अशी एक दुसरी आख्यायिका आहे. तरी एकंदरींत श्रीरामदासांनीं आपला एक सर्वस्वी स्वतंत्र असा पंथ निर्माण केला यांत शंका नाहीं. या सर्व संतांमध्यें अनुभूतीचे जे विविध प्रकार दिसून येतात त्यावरून या प्रमुख महाराष्ट्रीय आत्मज्ञांचें पुनर्वर्गीकरण केल्यास खालीं दिल्याप्रमाणें त्यांचे वर्ग पडतील :

# साईबाबांचा नृसिंहावतार

—गोपीनाथ तळवलकर

**सुप्रसिद्ध साहित्यिक व ' आनंद ' या मासिकाचे संपादक श्री. गोपीनाथ तळवलकर यांस बालपणी श्रीसाईबाबांचे शिर्डीत दर्शन घडलें त्यावेळीं काय अनुभव आला त्यासंबंधीं एक लेख त्यानीं केसरींत ( ता. २७ मार्च १९६६ ) प्रसिद्ध केला आहे. तो कृतज्ञतापूर्वक आमच्या वाचकांसाठीं पुढें उद्धृत करण्यांत येत आहे.**

कुणाचा रोष होणें हा कांहीं आनंददायक प्रसंग खास नाही. पण कित्येक गोष्टी आनंददायक नसल्या तरी शुभसूचक असूं शकतात. विशेषतः साक्षात्कारी पुरुषांचा अकारण क्रोध हा कित्येकदा प्रेमाचाच आविष्कार असतो. अपशब्दांच्या द्रोणांत आपला कृपाप्रसाद घालून ते तो तुमच्यापुढे धरतात. पण ते समजावे लागतें, समजून घ्यावे लागते. पुष्कळ वेळा तें समजायला बुद्धि अनुतापाच्या दिव्यांतून जावी लागते.

मला तरी ही गोष्ट कळायला जीवनाची दुपार उलटली. पन्नास वर्षांपूर्वी श्रीसाईबाबा यांच्या माहात्म्याची प्रसिद्धी आजच्याइतकी झाली नव्हती. आज आरतीच्या वेळी तुम्ही शिरडीला गेलात तर बंगाली, तामीळ, कन्नड, हिंदी असा आंतरभारतीचा समारोह तुम्हांला तेथे भरलेला दिसेल. विविध प्रकारचे तोंडावळे आणि प्रांतोप्रांतीचे पोषाख यांचें प्रदर्शनच भरलेलें आढळेल. एखादी स्वप्नाळू चेहऱ्याची वंग युवती लुंगी नेसलेल्या एखाद्या मोक्षगुण्डमच्या शेजारी रांगेत उभी असलेली दिसेल.

---

( १ ) श्रीज्ञानेश्वर हे बुद्धिप्रधान आत्मज्ञ आहेत; ( २ ) श्रीनामदेव हे लोकमतानुवर्ती कालाचे प्रवर्तक आहेत; ( ३ ) श्रीएकनाथांनीं संसार व परमार्थ यांची उत्तम प्रकारें सांगड घातली आहे. ( ४ ) तर श्रीतुकाराम यांचे अनुभूतिशास्त्र अतिशय व्यक्तिनिष्ठ आहे; व ( ५ ) श्रीरामदास कर्मयोगी संत आहेत. मनुष्यास आत्मज्ञान झालें तरी त्याचा मूळ स्वभाव कांहीं अंशानें कायम राहतो, असें मि. जॉली नामक फ्रेंच ग्रंथकारानें जें म्हटलें आहे, त्यांत सत्यांश बराच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. महाराष्ट्रीय संतांमध्यें जें अनेकविध प्रकार दिसतात, त्याचें कारणहि त्यांच्या उपजत स्वभावांतील भेदच होय. परंतु, ज्या ज्या राष्ट्रांत जाति, पंथ इत्यादि भेदरहित अध्यात्मकविचाराची व वाङ्मयाची कदर आहे, त्या राष्ट्रांतील अखिल मानव्यास सदैव आश्चर्यानें तोंडांत बोट घालावयास लावील अशा प्रकारचें श्रेष्ठ वाङ्मय महाराष्ट्रांतील या सर्व संतांनीं निर्माण केलें आहे, ही गोष्ट महाराष्ट्रास अत्यंत अभिमानास्पद आहे यांत बिलकुल शंका नाहीं.

मुंबईचा नटवरलाल पंजाबच्या कौशलला 'केम छे ?' असे प्रसन्न मनानें विचारीत असेल. आज लक्षावधि लोकांच्या गळ्यांत साईबाबांचा ताइत आढळतो. गर्द अरण्यांत एखाद्या खेड्याच्या अड्ड्यावर बस उभी राहिली तर चार कपबशा आणि शेवचिवड्याचे दोन डबे एवढ्या भांडवलावर चालणारे झोंपडींतलें उपाहारगृहहि 'साईबाबा क्षुधाशांति सदन' अशी पाटी कपाळावर मिरवताना दिसते ! साईबाबांचें नांव दाहि दिशांना गेलें आहे.

पण मी सांगतों त्या वेळीं या महंताच्या उपासनेचा प्रचार इतका झाला नव्हता. अर्थात् भक्तांची गर्दी वाढत होतीच. माझे वडील त्यावेळीं लाख–बेलापूरजवळाल पढेगावीं नोकरीला होते. शिर्डीला जायचे म्हणून आम्ही बैलगाडीतून निघालों. कांही मैलांचाच तो प्रवास पण कोण हृदयंगम वाटला ! वाटेंत प्रवरेचे कालवे लागत होते, वहीवर पट्टीनें रेघा आखाव्यात तसे. पुढे या भागांत ऊस–द्राक्षांचे जें 'गोड' वैभव उदयाला आले त्याची आखणीच चालली होती त्या वेळीं. आमची गाडी मध्येंच कुठें झाडाची सावली पाहून थांबे. मग खाली उतरून कालव्याचे पाणी शेतांत कसे वळवून घेतले आहे ते कुतुहलाने पहावें. कागदाची नाव त्यांत सोडावी, मोगली एरंडाचे झाड दिसलें तर नळ्या करून फुगे उडवावे, असा रमतगमत प्रवास आम्ही करीत होतो. कुठें गुन्हाळ लागे. भल्यामोठ्या चुल्यावर काहिली चढविलेल्या दिसत. तिथल्या आतिथ्याची चव कांहीं न्यारीच. बाजरीच्या भाकरीबरोबर गुळाची साय खाणें यांसारखी अपूर्व मेजवानी दुसरी नसेल ! देवासाठी गरुड अमृत नेत असता कलश हेलकाकन दोन थेंब खाली काहिलींत पडले की काय असें वाटल्यास नवल नाहीं. शिर्डीला पोचलों तेव्हा अशा सुंदर वातावरणानें मन भरून गेलें होतें.

मूळ शिर्डी गांव आजहि फारसें मोठें नाहीं. जवळ जवळ असेंच तेव्हाहि होतें. बाबांचे सान्निध्य नेहमीं लाभावें म्हणून मुंबईच्या एखाद्या भाटियाने बांधलेला एखादा टुमदार बंगला कुठे दिसे. पण त्यामुळे गावाचे जुनेपण जास्तच डोळ्यांत भरे. भारतांतल्या पांच–सहा लाख खेड्यांसारखेंच हें एक खेडें. परंतु साईबाबांनीं आपल्या अवतारकार्याकरितां तें स्थान पसंत केलें आणि त्याला महातीर्थाचें महत्त्व आलें. एके दिवशीं मशिदीलगतच्या दगडावर ही विभूति बसलेली गावकऱ्यांना दिसली. ऋषीचें बाल्य आणि तारुण्य यासंबंधीं गूढच असते. आपल्या अंतःचक्षुंपुढे असलेली ऋषींची मूर्ति वृद्ध आणि तेजःपुंज अशीच असते. साईबाबांचे तसेच आहे. असंख्य भक्तांपुढें वृद्ध योगी असेच ते कायमचे उभे आहेत. त्यांनी साधना कुठे केली असेल कोण जाणे ! जगापुढे आले ते सिद्ध होऊनच.

आम्ही मंदिरांत पोंचलों त्यावेळीं बाबा शतपावली करायला बाहेर गेले होते. वडिल पूजासाहित्य घेऊन उभे होते. आम्ही सर्व उत्सुकतेनें बाबांची वाट पहात होतों. बाबा आले आणि आपल्या आसनावर बसले. कुणाशी ते कांही बोलत नव्हते.

आपल्याच तंद्रींत असल्यासारखे ते दिसले. वडिलांनी माझ्या हातांत नारळ देऊन बाबांच्या पायीं वाहण्यास सांगितले. मी नारळ ठेवून बाबांच्या पायाला हात लावला— तों काय ? केवढ्याने गर्जले ते ! त्यांनी नारळ दूर फेकून दिला. आईवडील घाबरले. मला तर रडूंच कोसळले. साईबाबांच्या तोंडाकडे मला पाहवेना. स्तंभातून जणूं नृसिंह प्रकट झाला होता.

भोवतालची परिचित मंडळी मात्र खुषींत होतीं. कांही प्रसन्नपणें हसत होते. वडिलांनी थोड्या रागानेच त्यांच्याकडे पाहिलें. तेव्हा त्यातला एक जाणता माणूस पुढे होऊन म्हणाला, ' साईबाबांची कृपा झाली तुमच्या मुलावर. ते रागावले म्हणजे समजावं की, त्यांना या माणसाचं भलं करायचं आहे. चांगल्या मुहूर्तावर निघाला तुम्ही घरून ' आईवडील संतुष्ट झाले. साईबाबांना प्रणाम करून माझ्याकडे कौतुकाने पहात ते बाहेर पडले. मी वडिलांचा हात घट्ट धरून चाललों होतो. त्या तशा भीतीच्या अवस्थेतही मागे साईबाबांच्या जराजर्जर पण तेजस्वी मुखमंडळाकडे पाहण्याचा मला मोह झाला, छे, आता रागाचा अंशहि नव्हता चेहऱ्यावर ! शांत, अंतर्मुख असा भाव मला दिसला.

मग ते असे माझ्यावर रागावले कां ? त्यावेळीं तरी मला कळलें नाही. रागाच्या कसोटीला हा उतरतो की नाही हें तर त्यांना अजमावयाचे नसेल ? आरडाओरडा केल्यावर दुसऱ्याच क्षणीं त्यांच्या चेहेऱ्यावर स्मितासारखा प्रसन्न भाव दिसूं लागला. यावरून राग वरवरचा होता हे स्पष्ट होतें. ' भक्तीतून भीतीचें हीण काढून टाकल्याशिवाय भक्ति शुद्ध होत नाहीं. परमहंस उग्र रूप याचसाठीं दाखवितात. ' पण अर्जुनाप्रमाणें मला मात्र ते उग्र रूप असह्य झालें होतें. ' प्रसीद देवेश जगन्निवास ' असें थरथर कापत मी म्हणत होतों. आज इतक्या वर्षांनीं तो देखावा डोळ्यांपुढे आणून मी हर्षभरित होतो. प्रवरेचा ओघ बदलला आणि आमचे त्यावेळचें पढेगाव पाण्याखाली गेलें. पण साईबाबांनी प्रकट केलेल्या त्या नृसिंहावताराची स्मृति मात्र कायम आहे. ' देवांचा रोष हा वरासारखा असतो ' ( रोषो ऽपि वरेण्य तुल्यः ) म्हणतात. अज्ञात कारणानी आलेले संकट तितक्याच गूढ कारणाने जेव्हा टळतें तेव्हा मला हें वचन नेहमी आठवते. आणि तो रोष आपणाला मिळाला याची धन्यता वाटते.

---

—साऱ्या जगांत माता ही पवित्र असून तिची योग्यता सर्वश्रेष्ठ आहे. मानव जातीला जन्म देऊन उच्च दशेला आवश्यक असें ज्ञान इत्यादि सद्गुणाचे, सेवेचे व एकतेचे बाळकडू माताच पाजीत असते. यासाठीं आपली माता-पितरें ईश्वरसमान आहेत हें जी मुले जाणतात तींच मुले धन्य होत.

—सध्यां आपण करीत असलेले आपले कर्तव्य आपण योग्य तऱ्हेने पार पाडले म्हणजे आपले सामर्थ्य व ज्ञान वाढत जाऊन अति उच्च दशा प्राप्त करून घेता येते.

# विचार पोथी

—संत विनोबा

१२५. अस्तेयानें मी जग जिंकतों. अपरिग्रहानें तें सोडतों.

१२६. 'घरच्या घरीं करी चोरी तो एक मूर्ख'

असें रामदासांचें एक वचन आहे. कोणताहि चोर 'घरच्या घरीच' चोरी करीत असतो. म्हणून 'तो एक मूर्ख.'

१२७. सिंह हिंसक असल्यामुळे त्याला मागें वळून पहावें लागतें. अहिंसकाला सिंहावलोकनाचें कारण नाहीं.

१२८. तेज आणि क्षमा ह्या एकमेकांच्या व्याख्या आहेत.

१२९. जर आणि जेव्हां दुसऱ्याची सेवा घेण्यांत माझें कल्याण असेल, तर आणि तेव्हां माझी सेवा करण्यांत दुसऱ्याचेंहि कल्याण असेल आणि असेंच उलटपक्षीं.

१३०. लहानपणापासून मला मुरली जितकी गोड लागते तितकें दुसरे वाद्य गोड लागत नाहीं. मुरली आमचे राष्ट्रीय वाद्य आहे. गरिबांपासून श्रीमंतापर्यंत सर्वांना लभ्य आहे. रात्रीच्या शांत वेळीं दुरून मुरलीचा ध्वनि कानावर पडला, कीं भगवंताच्या दिव्य चरित्राचें स्मरण होतें.

१३१. कासवाप्रमाणें कर्मयोगांत शांत पण निश्चित पावलें टाकावीं.

कासवाप्रमाणें मजबूत पाठ करून जगाचे आघात सोसावे.

कासवाप्रमाणें विषयांपासून इंद्रियें आवरावीं.

कासवाप्रमाणें दृष्टि प्रेमानें भरलेली असावी.

१३२. ज्यांना लोकसंग्रह करण्याची हौस वाटते त्यांना योग्यता नसते, आणि ज्यांना योग्यता असते त्यांना हौस वाटत नाहीं. लोकसंग्रहाला ह्या पेचांतून देवानेंच सोडवावें !

१३३. सात्त्विक आहारांतहि जो स्वाद उत्पन्न होतो तो हिंसा.

१३४. वेद ज्याला ॐ म्हणतात तो संतांचा राम. 'राम-कृष्ण-हरि' ह्या त्याच्याच तीन मात्रा समजाव्या.

१३५. ज्याचे 'भूतमात्रीं हरि' हें सूत्र सुटलें त्याचा देव हरवला.

१३६. स्मर्तव्याची विस्मृति हें मानसिक आळसाचें लक्षण आहे.

१३७. स्वधर्माविषयीं प्रेम, परधर्माविषयीं आदर आणि अधर्माविषयीं उपेक्षा मिळून धर्म.

१३८. रामाच्या पायाचा स्पर्श अयोध्येपासून लंकेपर्यंत असंख्य दगडांना झाला असेल, पण त्यांतून 'अहल्या शिळा'च तेवढी उद्धरली. तसेंच अहल्येलाहि असंख्य लोकांचे पाय लागले असतील. पण रामाच्याच पादस्पर्शानें ती जागी झाली. सर्वांनें

संतांच्या वाटेंत दगड होऊन पडावें. मग 'अहल्याराम' न्यायानें ज्यांचा जेव्हां उद्धार होणार असेल तेव्हां होईल.

१३९. शिक्षण–शास्त्रानें 'अहल्याराम–न्याय' घोकून ठेवावा, म्हणजे, अहंकार नाहींसा होऊन त्याची दृष्टि निवळेल.

१४०. आत्मसंतोष आणि अल्पसंतोष ह्यांत अंतर आहे. पहिली अध्यात्मिक वस्तु आहे. दुसरी व्यावारिक आहे. ती चांगली किंवा वाईटहि असूं शकेल. चांगली असल्यास आध्यात्मिकतेला पोषक होईल.

१४१. देव खरा आहे. धर्म खरा आहे. संत खरे आहेत कारण, सत्य खरें आहे. तोच देव, तोच धर्म आणि तेच संतांचें स्वरूप.

१४२. असत्यांतून सत्यांत, अंधारांतून प्रकाशांत, मृत्यूंतून अमृतांत हें साधकाचें उत्तरायण.

१४३. आपण साधनेची काळजी करावी. सिद्धीची काळजी करण्यास साधना समर्थ आहे. किंवा ह्याचाच अर्थ, ईश्वर समर्थ आहे.

१४४. विरक्तांच्या निष्ठूरतेंत जो प्रेम पहातो आणि आसक्तांच्या प्रेमात जो निष्ठुरता पहातो तोच पहातो.

१४५. सामुदायिक साधनेंत व्यक्तिगत साधनेचा कस पडातळून पहातां येतो, आणि मनाचे कोनेकोपरे झिजण्याला मदत होते.

१४६. मला बाहेरून किती मिळालें आणि माझें स्वतःचें आंतलें किती, हें मी पहातो तेव्हां माझें असें कांही उरत नाहीं. 'इदं न मम' ही भावना करण्याचें मला कारणच नाहीं.

१४७. वैदिक ऋषि जेव्हां 'मला तांदूळ पाहिजे, मला गहूं पाहिजे, मला मसूर पाहिजे' इत्यादि म्हणतो, तेव्हां त्याच्या 'मी' मध्यें त्रिभुवनाचा समावेश झालेला आहे.

१४८. टेकडीसारखा उंच होण्याची मला मौज वाटत नाहीं. माझी माती आस-पासच्या जमिनीवर पसरली जावी ह्यांत मला आनंद आहे.

१४९. जाणत्याने जड होऊन रहावें असें शास्त्र सांगते. जड होऊन राहणे म्हणजे कर्मांत वागणें.

१५०. तपांत तीन वस्तु आहेत. (१) चित्तशुद्धी (२) निर्माणशक्ति आणि (३) ज्ञान.

तप करतांना शेवटच्या दोहोंविषयीं अनासक्ति असेल तर तिन्ही लाभतील.

१५१. इतिहासाचे अध्ययन म्हणजे आपल्या पूर्व जन्मांची पाहणी.

१५२. डबक्यांतले किंवा समुद्रांतले विवाह चांगले नाहींत. विविहाला नदी पाहिजे.

१५३. प्रेमानेंच ठसा. बरा कीं वाईट नीतिअनीतीवर.

१५४. ज्ञान हे हि ज्ञानगम्य आहे. म्हणजे अगाऊ ज्ञान असेल तर पुढे ज्ञान मिळावयाचें.

१५५. असत्कर्माचें डोकें मारावें. सत्कर्माला घायाळ करावें. सत्कर्माला घायाळ करण्याची युक्ति म्हणजेच फलत्याग.

१५६. प्राप्तीपेक्षां प्रयत्नाचा आनंद विशेष आहे.

१५७. आग्रह महत्त्वाची शक्ति आहे. किरकोळ कामांत वापरून टाकणे बरें नाहीं.

१५८. उन्मनीपलीकडचें स्वैर मन ही सहजावस्था.

१५९. सकाळचा तेवढा रामप्रहर. आणि बाकीचे काय हरामप्रहर आहेत? भक्ताला सर्व काळ सारखाच पवित्र असला पाहिजे.

१६०. पूर्वींची तपश्चर्या न गमावतां पुढें पाऊल टाकणें हें सुधारकाचें काम आहे.

१६१. अकरण, निषिद्ध, काम्यकर्म, फलाभिसंधि आणि अहंकार ह्या पांच वस्तूंचा त्याग करणें ह्याचे नांव संन्यास. तोच योग.

१६२. आहार-विधान—

( १ ) यज्ञ-शेष, ( २ ) सात्त्विक, ( ३ ) परिमित, ( ४ ) अस्वादवृत्तीनें, ( ५ ) देवाला अर्पण करून खावें.

१६३. कर्म सोडणें अशक्य आहे. कारण सोडणें हेंहि कर्म आहे.

१६४. ‘संन्यास घेणें ह्याला कांहीच अर्थ नाहीं. कारण, संन्यास म्हणजेच न घेणें.’

१६५. सत्कर्म आचरून त्यांतून फळ काढूं पाहणें म्हणजे गंगेंत बुडी मारून गाळ उपसण्यासारखें आहे.

१६६. ‘पुढें’ ‘मागें’ ही अव्ययें मराठी भाषेंत दिग्दर्शक असून कालदर्शक आहेत. ह्या अव्ययांशी समानार्थक असलेली कोणत्याहि भाषेंतील अव्ययें अशीच उभयदर्शक आहेत. ह्यावरून मनुष्याच्या मनाचा कल सहजस्फूर्तीनें दिक आणि काल एकरूप मानण्याकडे दिसतो.

१६७. ‘जगाच्या पूर्वीं काय होते?’ ह्या तुझ्या प्रश्नाचा अभाव होता.

१६८. एक रज्जु-सर्पाला भिऊन पळ काढतो. दुसरा रज्जु-सर्पाला धोपटत सुटतो. अर्थ एकच.

१६९. जगांत देव सांपडत नसेल, तर बाहेर सांपडण्याची आशा नको.

१७०. जगामुळें ‘जगाच्या’ डोळ्यांमुळे ‘रूपाचें,’ बुद्धीमुळें ‘ज्ञान,’ आत्म्यामुळें होतें.’

१७१. ‘आत्म्याचें अस्तित्व’ हे शब्द पुनरुक्त आहेत. कारण, आत्मा म्हणजेच अस्तित्व.

१७२. देवा मला भुक्ति नको, मुक्ति नको—भक्ति दे. सिद्धि नको, समाधि नको—सेवा दे.

१७३. धुमसत असतांना प्रकट करू नये. पेटल्यावर दिसेलच.

१७४. विद्युत्स्फुरण हें साधकाला आश्वासन आहे. तेवढ्यावर विसंबूं नये. सूर्यप्रकाश लाभेपर्यंत प्रयत्न चालू ठेवावा.

# कै. भिकाजी धोंडू ऊर्फ दादा सावंत

कै. भिकाजी धोंडू ऊर्फ दादा सावंत यांचा जन्म ऑगस्ट १९०३ सालीं, पेंडूर (वाडी खरारें) ता. मालवण, जि. रत्नागिरी, येथें एका शेतकरी कुटुंबांत झाला. प्राथमिक शिक्षण आपल्या गांवीं करून ते लहान वयांतच मुंबईला आले. पहिलीं कांहीं वर्षें इकडे–तिकडे नोकरी करून व रात्रींच्या शाळेंत जाऊन त्यांनीं इंग्रजी चार इयत्तापर्यंत आपलें शिक्षण पुरें केलें. त्यानंतर ते बी. इ. एस. टी. कंपनीमध्यें कंडक्टरचे नोकरीवर राहिले. तिथें ते इनामेंइतबारें व हुशारीनें नोकरी करून इन्स्पेक्टरच्या हुद्यापर्यंत चढले व वयाच्या ५५ व्या वर्षी तेथून सेवानिवृत्त झाले. त्यानंतर गेलीं सुमारें सात वर्षें त्यांनीं श्री साईबाबा संस्थान (शिरडी) यांच्या मुंबईच्या ऑफिसांत "साई लीला" मासिकाचे कारकून म्हणून काम केलें. ह्या काळांत त्यांनीं आपल्या गोड वाणीनें बऱ्याचशा लोकांस "साईलीला" मासिकाचे वर्गणीदार करून घेतलें. तेथें नोकरीवर असतेवेळीं ता. १ एप्रिल १९६६ रोजीं दुपारीं २॥ वाजतां हृदयविकाराच्या झटक्यानें त्यांस देवाज्ञा झाली. "कर्तव्य पहिलें व नंतर इतर गोष्टी" असा त्यांचा खाक्या होता. मृत्यूच्या दिवशीं ते नेहमींपेक्षां लवकरच, सकाळीं कामावर गेले. "साईलीला" मासिकाचा रामनवमी विशेषांक वर्गणीदारांस लवकर मिळण्यासाठीं पोस्टांत टाकण्याची कामगिरी करीत असतांच त्यांना हृदयविकाराचा सौम्य झटका आला. वर्गणीदारांस वेळेवर अंक मिळाले पाहिजेत हीं तळमळ मनांत असल्यामुळें त्यांनीं आपल्या दुखण्याची पर्वा न करतां पोस्टाचे काम पुरें केलें व तेथून परत ऑफिसांत गेले. दुखणें वाढत आहे हें पाहून ऑफिसच्या प्यूननें त्यांना टॅक्सी करून घरीं पोचतें केलें. घरीं आल्यावर लगेच डॉक्टरनें औषधोपचार केले; परंतु कांहीं उपयोग न होता, थोड्या वेळानें त्यांचे देहावसान झालें.

कै. दादा सावंत यांचा स्वभाव गोड, मनमिळाऊ, निःस्वार्थी व दुसऱ्यास शक्यती मदत करण्याचा असल्यामुळें, त्यांचे सर्व थरांतील हजारों लोकांशी स्नेहसंबंध होते. आपल्या ज्ञातीबांधवांची आपल्या हातून कांहीं तरी सेवा घडावी अशी त्यांनीं तळमळ बाळगली व त्या हेतूनें निरलस व निःस्वार्थ बुद्धीनें व केव्हां केव्हां तर स्वतःच्या अडी–अडचणींकडे लक्ष न देतां व प्रसंगीं स्वतःच्या खिशास चाट देऊनही, आपणांस शक्य असेल ती मदत ते त्यांस करीत असत.

त्यांच्या मागें त्यांची पत्नी, दोन मुलगे, तीन मुली, सून, जांवई व ६ नातवंडें एवढा परिवार आहे.

श्री साईबाबांची सेवा करतां करतां त्यांना मृत्यु आला तेव्हां त्यांच्या आत्म्यास श्री साईबाबा शांती देवोत हीच त्यांच्या चरणापाशीं विनंती आहे.

# सीतामाईचें आदर्श जीवन

वाल्मीकींनीं रामचंद्रांच्या जीवनद्वारा चरित्राचा उच्च आणि भव्य आदर्श दाखविला आहे, जगांत उच्चतर आणि भव्य कोणती व्यक्ति असेल तर ती रामच समजायला पाहिजे. चरित्रनायकाला शोभणारी पवित्र आणि दिव्य पत्नी असावयास पाहिजे. भारतीय स्त्रीजीवनाचा अंतिम आदर्श म्हणजे सीता. वाल्मीकींना स्त्रीत्वाचें अंतिम आदर्श सीतेचे ठिकाणीं पाहायला मिळाले होतें; ही गोष्ट त्यांच्या लिखाणावरून स्पष्ट होते. खरोखर! आज आपण एक अत्यंत दिव्य आणि अत्यंत मृदु असें चरित्रपुष्प हातांत घेतलें आहे. सीतेचें स्त्रीजीवन पाहून संपूर्ण जग आश्चर्यचकित झालेलें आहे.

हिच्यासारखें लावण्यरत्न, स्वर्गीय पुष्प आणि तिच्यासारखा स्त्रीत्वाचा अंतिम आदर्श मनुष्याच्या पोटांत कसा निर्माण होईल अशी कवीला शंका आली. रामासारखा भव्य पुरुष कदाचित् नऊ महिने उदरांत राहून निर्माण होऊं शकेल, परंतु सीतेसारखें रत्न मानवाच्या उदरांत निर्माण होणें कवीला अशक्य वाटलें; म्हणून त्या स्त्रीरत्नाला अयोनिज ठेवलें. वाल्मीकींना आत्मविश्वास होता कीं हजारों वर्षेंपर्यंत–दीर्घकाळपर्यंत–रामायण चालणार, मानवाला मार्गदर्शक होणार, जोंपर्यंत सत्याचे विचार स्थिर आहेत, लोकांत मांगल्य आहे, तोंपर्यंत लोक रामायण वाचणार, चिकित्सक लोक उपेक्षा करून म्हणतील, 'ही बौद्धिक दिवाळखोरी आहे–अंधश्रद्धा आहे–गप्पा आहेत.' परंतु तें सर्व सहन करायला तयार होऊन वाल्मीकींनीं सीतेला अयोनिज ठेविली.

कौसल्येच्या पोटीं रामाचा जन्म झाला. कोणी म्हणेल, 'शास्त्री महाराज, सीता पूर्वजन्मांत अमुक होती.' सीता कुठून आली? कोण होती? हें सर्व एका पुराणांत लिहिलें आहे, असें पुराणज्ञ म्हणतील, परंतु लोकहो! शुद्ध चित्रावर डांबर, कचरा कां उडवितां? सीता अयोनिज आहे हें तुम्हांला सहन नाहीं का होत? म्हणून वाल्मीकींनीं सीतेला जशी अयोनिज ठेविली आहे तशीच आपणही तिला ठेवूंया. वाल्मीकींनीं सीतेच्या पूर्वजन्माविषयीं विशेष माथाकूट केलेली नाहीं; मग आपण कां करावी? वाल्मीकींना सीतेच्या चरित्राविषयीं असें म्हणायचें होतें कीं, 'अशा तऱ्हेचे स्त्रीरत्न मानवाच्या उदरांत जन्माला आलें असेल काय? आपण सुद्धां जर सहृदयतेनें सीतेचें चरित्र वाचूं लागलों तर नक्की वाल्मीकींशीं आपलें एकमत होईल. शाबास वाल्मीकि!

वाल्मीकि केवळ भाषातज्ज्ञच नव्हते तर त्यांचे ठिकाणीं स्वतंत्र भाषा तयार करण्याची शक्ति होती–बुद्धि होती; अशा वाल्मीकींची भाषा सुद्धां सीतेच्या लावण्याचें वर्णन करतेवेळीं कुंठित झाली. महान् तपस्वी असलेल्या वाल्मीकींची शक्ति सुद्धां सौंदर्याचें वर्णन करतेवेळीं नष्ट झाली. सीता कोणत्याही अप्सरेपेक्षां अतिशय सुंदर होती.

जिचा जन्म दिव्य आहे तिचे वडील कोणाला करावें? हा विचार नियतीच्या मनांत आला. या ठिकाणीं तिचा पिता कोणीही झाला नाहीं, करावयाचा आहे.

कांहींही करण्याची वेळ आली कीं विचार पडतो. पत्नी करण्याचा विचार आला, कारण कीं मुलीचें पत्नींत रूपांतर करावयाचें आहे. ज्या ठिकाणीं कांहीं करावयाचें असेल तिथें आपण बारकाईनें चौकशी करतों. काळी, कुरूप कशीही असली तरी "मातृदेवो भव" म्हणून मानावी लागते. आई-बाप शोधायचे नसतात. ज्यांना आई-बाप करायचे असतात त्यांनीं सर्वश्रेष्ठ स्त्री-पुरुषांनाच आई-बाप केले पाहिजे-त्यांच्या हातांतच ती गोष्ट गेली पाहिजे. लावण्यरत्नाचा सुद्धां कोणी तरी दिव्य पिता व्हावयास पाहिजे.

वाल्मीकि म्हणतात, "म्हणून 'मिथिलायां प्रदग्धायां न मे दह्यति किंचन' असें बोलणाऱ्या महापुरुष विदेही जनकाला नियतीनें सीतेचा पिता म्हणून निवडलें. भगवान् ज्यांचें गीतेंत वर्णन करतात, 'अस्थिरता जनकादयः' अशा प्रकारच्या विदेही असलेल्या जनकांच्या पायाशीं बसून त्या स्वर्गीय पुष्पानें लोकोत्तरतेचे, सौजन्याचे, प्रेमाचे आणि चारित्र्याचे धडे घेतले होते. जन्मरहित अशा स्वर्गीय पुष्पाचा जनकासारखा पिता निश्चित केल्यावर आतां या पुष्पाचा पति कोण करावा ? तो सुद्धां नियतीनें नक्की केला. सुपात्र कोण मिळणार अशी जनकाला मोठी काळजी पडली होती. सीता महासती अनुसूयेला म्हणते कीं, 'माझें लग्न हा माझ्या वडिलांसमोर एक प्रश्न होता.' फूल कुस्करून टाकणाऱ्याच्या हातांत देतांच कामा नये. मुलीचा जन्म वडिलांना मोठ्या काळजींत टाकतो. ती जन्मल्यापासून तिचा विवाह होईपर्यंत आणि नंतरहि तिचा संसार सुखी व्हावा याविषयीं मरेपर्यंत आईबापाला काळजीच वाटत असते. एका कवीनें असें म्हटलें आहे कीं, "पुत्रीति जाता महतीह चिंता !" सामान्य आईबापांना जर इतकी काळजी वाटत असेल, तर जिचा जन्म दिव्य आहे, जिचे संस्कार आणि जीवन अद्वितीय आहेत, जिचें लावण्य लोकोत्तर आहे, अशा सीतेविषयीं जनकाला काळजी वाटली तर त्यांत नवल काय ? वाटेल त्या मुलाला पकडून त्याचे वडील श्रीमंत आहेत कीं नाहींत हें पाहून सीतेचा त्याच्याशीं विवाह करण्याची जनकाची इच्छा नव्हती. जनकानें हें निश्चित केलें कीं, शिवधनुष्याचा जो भंग करील त्याला सीता द्यायची. शिवधनुष्याला उचलणें महासामर्थ्यवान् माणसाला देखील शक्य नव्हतें. अशा धनुष्यावर दोरी चढविणें तर सोडूनच द्या, परंतु रामानें त्याचा भंग करून नियतीची अपूर्णता पूर्ण केली. सुवर्णासारख्या तेजस्वी व्यक्तीला जनकानें सीतेसारखें लावण्यरत्न समर्पण केलें.

जिथें दोन्ही सुंदर असतात तिथें दारिद्र्य असतें. नियतीनें इथें हा नियम सुद्धां काढून टाकला आणि जगाला असें दाखविलें कीं, योग्य व्यक्ती मिळतांच मी अपूर्ण नाहींशी करूं शकतें !

या ठिकाणीं सर्व नियम निसर्गानेंच निश्चित केलेले होते. कोणीं कांहीं नक्की केलेलें नाहीं; निश्चित करण्यांत मुळींच पुरुषार्थ केलेला नाहीं-पण सर्व झालें. राम अचानक स्वयंवर पाहाण्याकरितां गेला. धनुष्यभंगासाठीं दशरथानें रामाला पाठविलें नव्हतें.

सीतेला योग्य पति मिळणार नाहीं या बाबतींत आतां शंकाच उरली नाहीं. आदर्श, दिव्य आणि पवित्र संसार व्हायला पाहिजे अशी जिची अभिलाषा असेल ती स्त्री असा पति शोधते कीं ज्याच्यासमोर आदरभावानें स्वतःचें मस्तक नम्र व्हावें. 'our friend' हा विचार तिच्या मनांत कधीं येत नाहीं, नाहींतर चार दिवस मोह आणि नंतर प्रेम नाहींसें होतें. रामाविषयीं महासती अनुसूयेजवळ सीता म्हणते कीं, 'त्यांचें अलौकिक शौर्य, लोकोत्तर विवेक आणि विनय पाहून माझें मस्तक आदरभावानें नम्र झालें.'

स्त्रियांच्या मानसशास्त्राचा अभ्यास करूं तर आपल्या असें लक्षांत येईल कीं, "स्त्रियांना असा पति हवा असतो कीं ज्याच्यासमोर आदरभावानें मस्तक नम्र व्हावें—भीतीनें नव्हे." जिथें असें पाहायला मिळतें तिथेंच संसार आदर्श आणि प्रेमळ होतो. रामाचें व्यक्तिमत्त्वच असें होतें कीं, सीतेचें मस्तक नम्र झालें.

शिवधनुष्यभंगानंतर एक प्रसंग घडला. सर्व लोक जिचें वर्णन करीत होते अशा लावण्यमूर्ति सीतेला द्यायला जनक तयार झाला आणि जग ज्याच्या शिवधनुष्यभंगाच्या पुरुषार्थाचें वर्णन करीत होतें असा राम सीतेसारखें अलौकिक रत्न स्वीकारायला नकार देतो आणि म्हणतो, 'अगोदर मी वडिलांना विचारून येतों. वडिलांनीं संमति दिली तरच मी या रत्नाचा स्वीकार करीन!' खरोखर! रामाची अलौकिकता याच ठिकाणीं आहे! तारुण्यांत जागतिक विक्रम करून सीतेसारखें अलौकिक सौंदर्यवान् रत्न जवळ येतांच एवढा विवेक आणि एवढी नम्रता ज्याच्याजवळ आहे त्याची केवढी दिव्यता आणि लोकोत्तरता असेल याची कल्पना करा! आजचे सुधारलेले आणि सभ्य मानव (!) सामान्य मुलीला पाहूनसुद्धां तिच्या मोहांत पडून वचन देतात—आणि आईबापांचा विचार करीत नाहींत. त्यांना सांगायला पाहिजे, 'अहो सुधारलेले सभ्य लोकहो! रामचरित्र पहा!' पण त्यांना रामचरित्र वाचायला सवड कुठें आहे! सीतेसारखें लावण्यरत्न आणि रामासारखें उसळतें रक्त असतांनासुद्धां विवेक ठेवून राम म्हणाला, 'वडिलांनीं सांगितलें तर मी स्वीकारीन.' सीतेचें सौंदर्य पाहून सौंदर्याची देवीसुद्धां लाजेल. सीतेनें सुद्धां रामाचें हें प्रत्युत्तर ऐकून त्याच्या आर्यत्वाची प्रशंसा महासती अनुसूयेजवळ केली होती. सीता हृदयानें त्याचवेळीं रामापुढें नम्र झाली होती. वाल्मीकींनीं असें दाखविलें आहे कीं, राम सीतेपेक्षांहि वरचढ अशी मूर्ति आहे.

दांपत्यजीवनाचे गुण रामाजवळ होते. त्याचप्रमाणे सीतेजवळसुद्धां होते. राम किंवा सीता सामान्य व्यक्ति नव्हत्या. सीतेजवळ अलौकिक सौंदर्य तर होतेंच. रामासारखी अलौकिक व्यक्ति कीं जिचें मन स्वतःच्या ताब्यांत होतें तीसुद्धां सीतेचे गुण पाहून इतकी आकृष्ट झाली कीं दोघांचे देह वेगळे होते, पण आत्मा एकच होता. राम आणि सीता यांचें सौंदर्य व गुण यांचें वर्णन वाचतांना असें वाटतें कीं गुणापेक्षां सौंदर्य वरचढ आहे कीं सौंदर्यापेक्षां गुण जास्त आकर्षक आहेत हें कळतच नाहीं. श्रेष्ठ गुण आणि मनुष्याच्या उदरांत जन्माला येणार नाहीं असें सौंदर्य सीतेजवळ होतें. रामाच्या हृदयांत काय आहे तें न विचारतां आणि न सांगतां सीता रामाचा केवळ चेहरा पाहून जाणत असे. दांपत्यजीवनाचा रम्यतर संसार कवींनीं या ठिकाणीं चित्रित केला आहे. हा संसार रम्यतर आणि रम्यतम होता. त्यांच्यासारखा संसार कोणाचा नव्हता.

सीतेचें जीवन पाहिलें तर अपहरण होण्याच्या अगोदरचा काळ सीतेच्या जीवनांतला सुखाच्या चरम सीतेचा होता. माझ्या कल्पनेप्रमाणें सीतेचा वनवासांतील सुखांतला सुखी काळ होता. रामापुढें सीतेला जगांतल्या सर्व गोष्टी स्वर्ग आणि मोक्ष सुद्धां तुच्छ होत्या! रामाची सुद्धां सीतेविषयीं तशीच भावना होती. अशा दोघांचा आत्मीय संबंध होता. रामाच्या पराक्रमावर सीतेचा खूपच विश्वास होता. म्हणून रामाच्या बाहूंवर काळजीचा भार टाकून सीता निर्भय होऊन वनांत सुद्धां लीलेनें नाचत असे, बागडत असे. मुलापेक्षां सून वनांत गेली त्याचें सासूला अतिशय दुःख झालें होतें. ही सुनेच्या वर्तनाची उच्चता सुचविते कीं, सासूच्या मनांत सुद्धां मुलापेक्षां सुनेवर अमर्याद प्रेम होतें. 'जिला दोन पावलेंही चालायची संवय नाहीं ती सीता वनांत गेली आहे. तिचें कसें होतें!' अशी काळजी व्यक्त करून कौसल्या सुमंत्राला विचारते. सुमंत्र म्हणतो, "राजमहालाच्या बागेंत ती जशी लीलेनें फिरत होती तशीच जंगलांतही फिरत आहे. फळें, फुलें, लता, वृक्ष, वनस्पति, पत्थर, नदी, पर्वत याविषयीं सूक्ष्मांतील सूक्ष्म माहिती विचारून रामाला हैराण करते. या वस्तूंत ती इतकी तल्लीन झालेली आहे कीं, ती अयोध्येला विसरली आहे. तिनें दागिने काढून ठेविले असूनही ती सुंदर दिसते. तुम्हीं पाठविलेले दागिनेसुद्धां घालायला ती तयार नाहीं. तिच्या अलौकिक देहसौंदर्यानें आणि लोकोत्तर गुणसौंदर्यानें तीं जंगलांत अशी शोभते कीं, सामान्य स्थूल दागिन्यांची तिला गरजच नाहीं."

पंचवटींतल्या रम्य संसाराचें वर्णन अरण्यकांडांत आहे. तें वाचल्यानंतर माणसाच्या मनांत अशी इच्छा उत्पन्न होते कीं, 'आपणहि वनांत जावें.' सीतेनें मायावी मृग पाहिला त्यावेळीं विलोभनीय दृष्टीनें रामाकडे पाहून म्हणते, "मला हरीण हवा." लक्ष्मण म्हणाला, "तो मायावी आहे, आपल्याला फसविण्यासाठीं आला आहे." पण त्यानें रामाचें समाधान झालें नाहीं. कारण लक्ष्मणाच्या बुद्धिवादापेक्षांसुद्धां सीतेचें विलोभनीय कारुण्य इतकें मोठें होतें कीं, तिच्या नेत्रांत प्रदर्शित झालेलें प्रेम पाहून विचार न करतांच रामानें उडी घेतली. सीतेच्या जीवनांतला हा सुवर्णकाळ होता. सीतेला सुख मिळालें नाहीं हें म्हणणाऱ्यांनीं रामायण वाचलें नाहीं.

या सर्व सुखांचा सुवर्ण कळस म्हणजे राम-रावणयुद्धानंतरचा काळ. पुष्पक विमानांतून परत येतांना सीता विमानांत बसलेली असते व विचार करते कीं, "मी जगद्वंद्य रामाची पत्नी आहे." अशा तऱ्हेचे भाव तिच्या मुखावर आहेत. सीतेच्या हृदयांत त्यावेळीं रामाविषयी सात्त्विक अभिमान निर्माण झालेला असतो, त्याचें प्रतिबिंब म्हणून तिच्या मुखावर उमटलेल्या अद्वितीय भावांचें वर्णन करणाऱ्या वाल्मीकींची लेखणी पाहाण्यासारखी आहे. ज्याची दृष्टि आपल्यावर पडावी म्हणून पंचप्राणाची आरती करून हजारों माणसें वाट पहात बसलेलीं असत तो राम सीतेबरोबर प्रेमाच्या दोन गोष्टी करीत होता हें वर्णन अविस्मरणीय आहे. हृदयंगम आहे. सीतेला या प्रसंगी खूपच आनंद होतो तें सांगण्यांत आश्चर्य तें कसलें? अशा तऱ्हेच्या लोकोत्तर पतीची मी पत्नी आहे ही भावनाच सीतेच्या उच्च सुखाचें दिग्दर्शन करीत आहे. जिचा

पति दारू पिऊन कुबमध्यें पडलेला असतो, त्या स्त्रीची मानसिक परिस्थिति पहा! ती काय बरें विचार करीत असेल? मस्तक उंच करून असें म्हणायला पाहिजे कीं, तो काळ सीतेच्या जीवनांतला सुवर्ण कळस आहे. अयोध्येंत आल्यानंतर अरुंधती आणि वसिष्ठ यांच्यासारखा तेजस्वी संसार राम आणि सीता यांनीं केलेला आहे. त्यांची दिनचर्या सुद्धां अतिशयच सुंदर होती. बारा वर्षेंपर्यंत दोघांनी परस्परांचा व्यक्तिगत विकास होण्यासाठीं सतत प्रयत्न केले.

सकाळच्या पहिल्या प्रहरीं स्वतःचा मानसिक, बौद्धिक, शारीरिक आणि जिथें दृष्टीही पोंचणार नाहीं अशा तऱ्हेच्या उच्च विकासाठीं चित्तैकाग्र्य, प्रभुभक्ति आणि स्वाध्याय दोघेंही बरोबरच करीत असत. दुसऱ्या प्रहरीं राम राज्यकारभार पहात असे; सीता सासू वगैरे कुटुंबियांची शुश्रूषा करीत असे. तिसऱ्या प्रहरीं राम सीतेच्या अंतः पुरांत येऊन आनंदाच्या आणि प्रेमाच्या गोष्टी करीत असे. पति सर्वश्रेष्ठ असल्यावर आणखी काय पाहिजे! जगांत सौंदर्य आणि गुण एकत्र असलेले क्वचितच पाहायला मिळतात. सीतेचे ठिकाणीं केवळ सौंदर्यच नव्हतें, श्रेष्ठ प्रतीचे गुणहि होते. या गुणांनीं जीवनसौंदर्य निर्माण झालें होतें. एका सासूचें प्रेम संपादन करतां करतां टाके ढिले होतात, तर सीतेनें स्वतःच्या गुणांनीं तीन सासूंचें प्रेम संपादन केलें होतें! सासूंना प्राणांसारखी झाली होती–प्राण घेणारी नव्हे. केवळ सासू–वडील माणसें यांचेंच नव्हे, तर कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीचें मन सीतेनें आपल्याकडे खेंचून घेतलें होतें. प्रत्येकाला असें वाटत होतें कीं, 'केव्हां सीता आम्हांला सांगते व आम्हीं तें करतो!' दुसऱ्याच्या घरीं जाऊन दुसऱ्याला आपलासा करणें हें स्त्रियाच करूं शकतात. पुरुष एक दिवस दुसऱ्याच्या घरीं गेला तर कंटाळा येतो. खरोखर! केव्हांही ज्याचें तोंड पाहिलेलें नाहीं अशा व्यक्तीला आपलासा करण्याची त्यांच्याठिकाणीं अलौकिक शक्ति परमेश्वरानें ठेवली आहे.

कुटुंबांतील प्रत्येक व्यक्ति तिच्या गुणांमुळें आकृष्ट होऊन मोहित झाली होती आणि 'सीता, सीता' म्हणून नाचत होती. अयोध्येंतील प्रत्येक स्त्री तिच्याकडे आदर्श स्त्री या नात्यानें पहात होती. ही तर झाली सामान्य माणसांची गोष्ट. तिचा त्याग आणि प्रेमाची पवित्र भावना यांमुळें जंगलांतील तपस्वीसुद्धां तिच्याकडे प्रेमळ दृष्टीनें पहात असत. अत्रिऋषींची पत्नी अनुसूया म्हणते, "हे पतिव्रते सीते! तुला काय आशीर्वाद देऊं? तुझ्यामुळें दोन्ही कुळांचा उद्धार झालेला आहे." तपस्विश्रेष्ठ अगस्ति ऋषी सुद्धां रामाला उपदेश करतांना म्हणतात, कीं, "कठोर कर्तव्याचरण करणाऱ्या सीते-सारख्या स्त्रीचें सर्वंच प्रिय कर." अशा तऱ्हेनें सीतेनें स्वतः स्वतःच्या आचरणानेंच सामान्य लोकांचा आणि महापुरुषांचा विश्वास संपादन केला होता. अशा तऱ्हेचा विश्वास संपादन करणें ही लोकोत्तर गोष्ट आहे. तिचें पतिप्रेम वर्णन करतां येणार नाहीं असें अलौकिक होतें.

राम वनांत जायला निघाला त्यावेळीं सीतेजवळ जाऊन तिला उपदेश करतो कीं, 'प्रत्येकाशीं तूं याप्रमाणें वाग.' राम शेवटच्या श्लोकांत म्हणतो कीः—

"ऋद्धियुक्ता हि पुरुषाः न सहन्ते परस्तवम् ।
तस्मात् नैव गुणाः स्तव्याः भरतस्याऽग्रतो मम ॥

ज्यांच्याजवळ समृद्धि असते त्यांच्याजवळ एक दोष असतो कीं, त्यांना दुसऱ्यांची स्तुति सहन होत नाहीं. म्हणून भरताजवळ माझे गुण गाऊं नकोस. राम जंगलांत जातो त्यावेळींला अयोध्येंत राहायचें, कोणाशीं कसें वर्तन करायचें, घरांतल्या माणसां-बरोबर कसें वागायचें इत्यादि गोष्टी राम सांगत असतो. परंतु हा सर्व उपदेश जणूं कांहीं ऐकलाच नाहीं असें दाखवून सीता रामाबरोबर वनांत जायला तयार होते. राम त्यावेळीं जंगलांतल्या भयंकर गोष्टींचें वर्णन १८ श्लोकांत करतो. आणि वारंवार वनांतल्या दुःखांची कल्पना देतो कीं–'तस्मात् दुःखतरं वनम् ।......तस्मात् दुःखतरं वनम् ।' परंतु सीतेवर त्याचा कांहींच परिणाम झालेला नाहीं.

सीता म्हणते, 'तुम्हीं काय सांगितलेंत तें मीं ऐकलेंच नाहीं.' राम पुन्हां वनांतल्या दुःखांचें वर्णन करतो. सीता बुद्धिमती आणि विवादकुशल होती. ती म्हणते कीं, "तुमचें हें सर्व म्हणणें खरें असेल, परंतु जगांत जाहीर काय होईल ? वनांत दुःखें आहेत म्हणून सीता वनांत गेली नाहीं हें नव्हे, तर आपले जांवईबुवा पुरुषवेष धारण केलेली स्त्री आहे असें जनक आणि मिथिलानगरींतील प्रजाजन समजतील ! बाहुबलानें एका स्त्रीचें रक्षण करायला असमर्थ असल्यामुळें राम सीतेला वनांत बरोबर घेऊन गेला नाहीं. अर्थात् तुमची बेअब्रू होऊं नये म्हणून मला यावयास पाहिजे." हें ऐकून राम दिङ्मूढ झाला आणि सीतेला बरोबर घेऊन जायला तयार झाला. सीता किती प्रखर बुद्धिशाली होती तें या ठिकाणीं दिसतें.

सीतेच्या बुद्धिप्रागल्भ्यामुळें रामाला पुष्कळ वेळीं तिच्याबरोबर शास्त्रार्थांची आणि सिद्धांतांची चर्चा करावी लागली आहे. एकदां सीतेनें असा प्रश्न विचारला कीं, "अरण्यवासी झालांत, मग हातांत शस्त्र कां ठेवलें आहे ? कारण अरण्यवासियांना तर अहिंसा आणि सत्य यांचींच शस्त्रें शोभतात ! रामाला या शंकेचें उत्तर देण्यासाठीं स्वतः शस्त्रसंन्यास कां केला नाहीं–यासाठीं अरण्यकांडांत मोठें प्रवचन द्यावें लागलें आहे. यावरून सीतेची विद्वत्ता आणि बुद्धिमत्ता स्पष्ट होते. अशा तऱ्हेची बुद्धिमान् आणि विदुषी स्त्री सुद्धां पतीला आत्मसमर्पण करूं शकते, हें सीतेच्या जीवनाचं वैशिष्ट्य आहे. आज तर दोन इयत्ता शिकलेली स्त्री सुशिक्षित असल्यामुळें स्वतःचें व्यक्तिमत्व विलीन करूं शकत नाहीं; अशा स्त्रियांनीं वाल्मीकींनीं चित्रित केलेली सीता जरूर वाचावी. सीतेचें रामावर अमर्याद प्रेम होते म्हणून रामाबरोबर 'वनांत जावें कीं न जावें' याची शंकाच तिला आली नाहीं. तिनें धन, रत्नें जें कांहीं होतें तें सर्व देऊनच टाकलें होतें. मुळींच शिल्लक ठेवलें नव्हतें. इतकेंच नव्हे तर रामासारखीं वनवासी वस्त्रें धारण केलीं होतीं. आश्चर्यांची गोष्ट आहे कीं, स्त्री दागिने काढून देते !

पतीवर इतकें प्रेम होतें की, लक्ष्मणावर प्रेम असूनही मारीचवधप्रसंगीं त्याला सीता कठोर शब्द बोलली. सीतेचें लक्ष्मणावर भावापेक्षांही अधिक प्रेम होतें. परंतु स्वतःचा पति संकटांत आहे ही कल्पना सुद्धां तिला सहन होत नव्हती. त्यामुळें आरोळी ऐकतांच लक्ष्मणाला वाटेल तसे शब्द बोलली. अत्युत्तम प्रेमाचा आविष्कार या ठिकाणीं पाहायला मिळतो. जितकें तिचें रामावर प्रेम होतें तितकाच तिचा रामाच्या सामर्थ्यावर विश्वासही होता. केवळ मोह नव्हता. रामावर पूर्ण विश्वास होता. कोणत्याही प्रकारच्या मोहाच्या स्वाधीन न होतां पूर्ण विचार करूनच सीतेनें रामावर प्रेम केलें होतें, त्यामुळें ती म्हणते, "दीनो वा राज्यहीनो वा यो मे भर्ता स मे गुरुः। माझा रामाशीं विवाह झालेला आहे; सांसारिक सुखासाठींच मी विवाहित झाल्यें नाहीं!" सीतेनें तिच्या जीवनाच्याद्वारें लग्न जीवनाचा दिव्य आदर्श हें दाखवून दिलें आहे. सुखोपभोगासाठीं एकत्र झाले-ल्यांना मानसिक दुःख होतें. संसारांत केवळ सुखासाठीं लोक एकत्र होत नाहींत, पण जें मोठें दुःख प्राप्त होणार आहे त्या दुःखांत एकानें दुसऱ्याचे अश्रू पुसण्यासाठीं एका प्रेमळ जीवनसोबत्याची गरज आहे आणि त्याकरितां विवाहित व्हायचें—लग्न म्हणजे चैन ही कल्पना आली कीं Divorce घटस्फोट वाढलेच म्हणून समजा. 'संसार केवळ सुखासाठीं नाहीं.' हें सीतेनें स्पष्ट दाखवून दिलें आहे.

सीतेचा रामावर किती विश्वास होता हें पहाण्याकरितां सीताहरणाचा प्रसंग पहा. रावण सीतेला घेऊन जातो त्यावेळीं सीतेला म्हणतो, "राम हलका आहे, मी किती मोठा आहे! लंकेंत सर्व देव माझी शुश्रूषा करीत आहेत." सीता म्हणते—' परंतु तूं कोल्हा आहेस आणि मी सिंहीण आहे. तूं सिंहिणीची अभिलाषा धरतोस हा तुझा मूर्खपणा आहे. देव तुला मारूं शकत नाहींत हें तूं काय सांगतोस? देव तुला मारूं शकत नसले तरीसुद्धां माझा राम तुला मारील!" केवढी निर्भयता! केवढा स्वतःच्या पतीच्या सामर्थ्यावर विश्वास! अशा प्रकारें राम तिचें आराध्य दैवत होतें. सीतेनें रामाला आत्मसमर्पण केलें होतें. म्हणून रामाचे जे विचार होते तेच सीतेचे होते. पतिपत्नींचे विचार जिथें भिन्न असतील तिथें रामराज्य कसें येणार? खरा संसार आत्मसमर्पणांत आहे—व्यक्तिस्वातंत्र्यांत नाहीं. दोघांचे एकच विचार—दोघांचें एकच मत, पतिपत्नींचें वेगळें मत नाहीं. शंका येईल कीं, पत्नीचें मत पतीनें कां स्वीकारूं नये? परंतु विलीन होण्याची—समर्पण करण्याची—शक्ति स्त्रीतच आहे. पुरुषांचे ठिकाणीं ही शक्ति नाहीं, पुरुष निर्बल आहे. मानसशास्त्राच्या आधारानें मी सांगतों कीं, हरिश्चंद्र निघाला कीं तारामती सुद्धां पाठोपाठ निघणारच. पत्नीनें स्वतःचे विचार पतींत विलीन करावयास पाहिजेत. पतीचे विचार आत्मसात् करावयास पाहिजेत. कारण त्यांच्याठिकाणीं असें करण्याची निसर्गदत्त शक्ति आहे. निसर्गानें जी गोष्ट तुमच्या ठिकाणीं ठेविली आहे ती तुम्हांला केलीच पाहिजे—हा निसर्गाचा नियम आहे. पुरुषांचें ठिकाणीं जशी गर्भधारणेची शक्ति नाहीं तशी आत्मसमर्पणाची शक्तिसुद्धां नाहीं. आत्मसमर्पण

म्हणजे विलीन होण्याची शक्ति. जोंपर्यंत स्वतंत्र मत, स्वतंत्र व्यक्तिमत्त्व, स्वतंत्र विचार आणि प्रवृत्ति जागृत आहे तोंपर्यंत नेहमीं संघर्ष राहाणार आणि सुख मिळणार नाहीं. ते विवाहित झालेले नसून एका गोठ्यांत बांधलेल्या दोन पशूंसारखे एकत्र राहातात.

सीतेनें कर्तव्यनिष्ठा आणि धर्मनिष्ठा यांमुळें वनांत जायचें ही गोष्ट रामाच्या तोंडून ऐकिली, त्यावेळीं कैकेयीनें काय सांगितलें?–तिचे शब्द काय होते? ती विचारून थांबली नाहीं. दुसरी एखादी स्त्री असती तर कैकेयीनें सांगितलेल्या शब्दांतून कसें सुटून जातां येईल तें पाहून पतीला सल्ला दिला असता. परंतु सीतेनें एक अक्षरही न विचारतां वनांत जाण्याचीच तयारी केली. दुसरा कोणताही सुटून जाण्याचा मार्गच नको होता. वाल्मीकीचें आकृष्ट होण्याचें हेंच कारण होतें कीं, सीतेनें रामांत स्वतःचें व्यक्तित्व विलीन केलें होतें. सीता म्हणते, 'रामाचा धर्म तो माझा धर्म.' इथें पत्नी-धर्मांचा पलायनवादच नाहीं, त्यामुळेंच तर रामापाठोपाठ जायला सीता एकदम तयार झाली. आज तर पलायनवाद धांवत येत आहे–कांहीं करायचें असेल तर त्यांतून सुटून जाण्याचे मार्ग शोधतों.

रामांत विलीन झालेल्या सीतेला राज्य कोणाला द्यावें याची कटकट नाहीं. ज्या ज्या आपत्ति सीतेवर आल्या त्या त्या तिच्या कठोर कर्तव्यनिष्ठा आणि आत्यंतिक धर्मनिष्ठा यांमुळेंच आलेल्या आहेत. या धर्मनिष्ठा आणि कर्तव्यनिष्ठेमुळेंच रावण तिला घेऊन जाऊं शकला. स्वतः पकडली गेल्यानंतरही घाबरली नाहीं. ती पूर्ण व्यवहारी होती. त्यामुळें, 'मी कोठें गेलें?' हें रामाला समजावें म्हणून स्वतःचीं नुपुरें वगैरे दागिने रस्त्यांत टाकून दिले होते. सीता व्यवहारी असल्यामुळेंच राक्षसींशीं हिंमतीनें वागत असे आणि हनुमानाची सुद्धां खूपच परीक्षा केल्यानंतर तिनें रामाचा दूत म्हणून त्याला मानलें.

आत्यंतिक धर्मनिष्ठा आणि उत्कट नैतिक कर्तव्यनिष्ठा यांमुळेंच, लक्ष्मणाची आज्ञा न मोडतांना सुद्धां तपस्व्यासारखी व्यक्ति त्यांच्या गृहस्थाश्रमांतून रिकाम्या हातानें परत गेली असें झालें नाहीं. इक्ष्वाकु कुळांतही असें कधींही घडलेलें नाहीं, म्हणून राम आणि लक्ष्मण नसतांना तूं काय रिकाम्या हातानें परत जाणार! रघूसमोर सुद्धां हाच प्रश्न निर्माण झाला होता. तपोवनासाठीं १४ कोटी सोन्याच्या मोहरा मागण्यासाठीं कौत्स आला होता. कौत्स रिकाम्या हातानें परत जावा ही गोष्ट त्याला रुचेना.

हा माझा पहिला पराभव आहे कीं रघूच्या दारांतून कोणाच्याहि घरीं जाणार नाहीं असा तेजस्वी ब्राह्मण, इच्छा पुरी न झाल्यामुळें परत जात आहे. रघू ही गोष्ट कधींहि करणार नाहीं. रघूच्यासमोर हा प्रश्न उभा राहिला. रामाचा पिता दशरथ, दशरथाचा पिता अज आणि अजाचा पिता रघु. सीतेच्या समोर सुद्धां हाच प्रश्न येऊन उभा राहिला. पंधरा पिढ्यांत जी गोष्ट झाली नाहीं ती राम–लक्ष्मण नसतांना माझ्यामुळें व्हावी हें कसें काय शक्य आहे? अशा तऱ्हेची आत्यंतिक निष्ठा असल्या-

मुळेंच सीता रघुकुळाची अब्रू वांचविण्याकरितां दान द्यायला जाते. त्याचा परिणाम असा होतो कीं, ती सांपडते. अशा तऱ्हेनें सीतेच्या वागणुकींत मूर्खपणा, भोळेपणा, वेडेपणा किंवा अज्ञानाचें उल्लंघन नव्हतेंच. सीता पुर्ण विचार करणारी होती.

स्वतःच्या चारित्र्याविषयीं सीतेला खूपच उज्ज्वल अभिमान होता. हनूमान म्हणतो, "इतकी दुःखी तूं कां झाली आहेस? चल, माझ्या खांद्यावर बसवून घेऊन जाईन." सीता म्हणते, "रामाशिवाय दुसऱ्या कोणत्याही पुरुषाच्या अवयवांचा या शरीराला स्पर्श होतां कामा नये.

रावण आला त्यावेळीं ती विवश होती. हनुमान हें ऐकून चकित होतो आणि म्हणतो, "हें सांगण्याची जरूरच नाहीं कीं, तूं रामाची पत्नी सीता आहेस. कारण रामाच्या पत्नीशिवाय दुसऱ्या कोणाची अशी भाषा असणारच नाहीं!"

सीता परत येते त्यावेळीं रामानें तिच्याविषयीं अविश्वास प्रकट केला आणि तिचा त्याग करायचें ठरविलें. सीता स्वतःच्या अतिशय जाज्वल्य चारित्र्यनिष्ठेमुळें त्यावेळीं दुःखी झाली. राम म्हणतो, 'तूं वाटेल तें सांगितलेंस तरी मी तुझा त्याग करीन.' रामाला स्वतःला खात्री होती कीं, सीता पवित्र आहे, परंतु कठोर कर्तव्यनिष्ठेचें पालन करणाऱ्या रामाला सोन्याची परीक्षा जगाला दाखवायची होती. सीता म्हणते, "तुम्हांला माझा त्याग करायचा होता तर मग दहा महिन्यांपूर्वींच कां नाहीं केलात? तुम्हांला शंका आली आहे असें जर मारुतिरायाजवळ सांगितलें असतेंत, तर मीं माझ्या जीवनाचा त्याग केला असता आणि तुमच्यावर इतकें दुःख सहन करण्याची पाळीच आली नसती. तुमच्या शरीराला केवढी मेहनत पडली, तुम्हांला केवढे परिश्रम करावे लागले!" एका बाजूला कठोर कर्तव्यनिष्ठेचें पालन करणारा राम आणि दुसऱ्या बाजूला सौजन्यमूर्ति सीता उभी आहे. राम क्रुद्ध झालेला नव्हता, तर कठोर कर्तव्यमूर्ति राम होता. सीता सुद्धां सौजन्यमूर्ति होती. शिव्या देणारी सीता नव्हती. गृहस्थाश्रमांतील हा रस ज्याला चाखतां येणार नाहीं त्याचें "वृथा गतं तस्य नरस्य जीवितम्।" याशिवाय दुसरें काय सांगणार? आज जर पति 'रांडे' म्हणेल, तर पत्नी 'तुमची आई रांड' असें म्हणून उभी राहील. या ठिकाणीं सौजन्यमूर्ति सीता रामाला सांगते, 'तुम्हीं कशाला एवढी मेहनत घेतलीत! मीं प्राणत्याग केला असता.' खरोखर! पतीनें अशा तऱ्हेनें सीतेच्या चारित्र्याच्या बाबतींत शंका काढली असताना त्याच्याविषयीं तिला दुःख झालें नाहीं, तर पतीनें परिश्रम घेतले म्हणून ती दुःखी झाली. अशा सौजन्यमूर्ति सीतेला पाहून मस्तक विनम्र होतें. खरोखर स्वतःच्या सौजन्यानें सीतेनें रामाला जिंकलें आहे आणि या ठिकाणीं सीतेचें चरित्र रामापेक्षां सुद्धां दिव्य आहे असें वाटतें.

सीता जितकी सौजन्यमूर्ति होती तितकीच हृदयाची उदारही होती. राक्षसींनीं सीतेला खूप त्रास दिला. मारुतिराय धांवत येतो आणि विचारतो कीं, 'तुला त्रास

देणाऱ्या राक्षसींना मी काय शासन करूं !' सीता म्हणते, 'एकीलाही बिलकुल त्रास देऊं नकोस. त्या तर पोटासाठीं त्रास देत होत्या. ज्याला मारायचा होता त्याला मारलें यांत सगळें आलें.' मनाचें असें औदार्य पाहून कोणाला सीतेविषयीं पूज्यभाव वाटणार नाहीं.

तिच्या संसारांत प्रेम अभंग होतें. कांहींचा विवाहापूर्वी व कित्येकांचा विवाहानंतर प्रेमभंग होतो. परंतु या ठिकाणीं अभंगताच होती. सीतात्यागामुळें लोकांच्या मनांत रामाविषयीं असलेला आदर थोडासा कमी होतो, परंतु जिचा त्याग केला तिच्या अंतःकरणांत रामाविषयीं मुळींच आदर कमी झालेला नव्हता; तर द्विगुणित झालेला होता—हेंच वैशिष्ट्य आहे. म्हणून माझी अशी नम्र प्रार्थना आहे कीं, रामाच्या सीतात्यागाच्या प्रसंगांत नाथालाल किंवा अमथालाल यांना रामाला दोष देण्याची जरूर नाहीं आणि रामावर आक्षेप घेण्याची आवश्यकता नाहीं. सीतेला हें सर्व समजलें होतें. ती म्हणते कीं, 'राम सीतेचा त्याग करतो ही गोष्ट अशक्य आहे; रामानें माझा नव्हे तर राजा रामानें राणी सीतेचा त्याग केला आहे. पौरजनांच्या निंदेला पात्र होणारी राणी होऊं शकत नाहीं, म्हणून माझा त्याग केला आहे.' कोणी अशी शंका विचारील कीं, सीता जर राणी होऊं शकत नसेल, तर रामानें राज्यगादी सोडायला पाहिजे होती. सीता म्हणते, "माझ्यासाठीं रामानें जर राज्यगादीचा त्याग केला असता तर त्याचे ठिकाणीं कर्तव्यपराङ्मुखता आली असती. कर्तव्यनिष्ठेमुळेंच रामानें माझा त्याग केला आहे." लक्ष्मणाला सांगते कीं, "रामाला माझा हा निरोप सांगा कीं, तुमच्या प्रकृतीची काळजी घ्या, माझ्या काळजीनें तुम्हांला त्रास होईल. माझी काळजी करूं नका. वडिलांच्यां जागीं असलेल्या वाल्मीकींच्या आश्रमांत मी आहे. बंधूंशीं प्रेमानें वर्तन करा. पौरजनांना तुमचें प्रेम द्या. ज्या पौरजनांसाठीं हें सर्व झालें त्यांच्यावर मुळींच रागावूं नका." शांतमूर्ति सीता संदेश देते आणि लक्ष्मण मस्तक खालीं करून हें ऐकतो. लक्ष्मणानें अश्रुपूर्ण नेत्रांनीं हा सीतेचा संदेश स्वीकारला. सीतेचा हा संदेश करुणरसप्रधान दिव्य श्लोकांत आहे तो ऐकून लक्ष्मणालासुद्धां वहिनीविषयीं अभिमान वाटतो. तिला खात्री वाटत होती कीं, 'राम माझा त्याग करूंच शकत नाहीं. त्याला माझा वियोग क्षणभरहि सहन होणार नाहीं. त्याचें कर्तव्याचरण सिंहासनाची पवित्रता टिकविण्यासाठीं होतें. कर्तव्याचरणांत रामाला कोणाचीही परवा नव्हती. सीतेची परवा नव्हती, म्हणून स्वतःच्या प्राणांचीही परवा नव्हती.' त्यावेळीं वकील, सॉलिसीटर्स आणि बॅरिस्टर होते. परंतु सीतेला पतीवर केस करण्याचा सल्ला द्यायला गेले नाहींत, कारण गेले असते तर लाथ मारून बाहेर काढण्याइतकी हिंमत असलेली सीता होती.

लवकुशांच्या वेळीं सीता परत येते, त्यावेळीं निष्पाप सीता उभी असते. राम वाल्मीकींना सांगतो कीं, 'सीतेविषयीं मला मुळींच शंका नाहीं. पौरजनांना समजाविण्यासाठीं, इक्ष्वाकु कुळाच्या प्रतिष्ठेसाठीं मला असें करावें लागलें.' त्यावेळीं सीता फार मोठी भयंकर प्रतिज्ञा करते.

मनसा कर्मणा वाचा यदि रामं समर्चये ।
तदा मे माधवी देवी विवरं दातुमर्हति ॥

कर्मानें, मनानें किंवा वाणीनें दुसऱ्यावर मी प्रेम केलेलें नाहीं. ‘मनसा’ हें फार कठीण व्रत आहे. हे सीतेचें जाज्वल्य चारित्र्य सांगतें. ‘मनसा’ हा शब्द ‘underline’ करण्यासारखा आहे.

असें सीता म्हणत असतांनाच त्या भूमीतून वसुंधरा सिंहासन घेऊन बाहेर येते. सीता त्याच्यावर बसते आणि ती भूमिप्रवेश करते. अशा तऱ्हेनें अयोनिज सीतेचा अंत सुद्धां तसाच अलौकिक आहे. विसाव्या शतकांतल्या लोकांचा विश्वासही बसणार नाहीं असे आदि आणि अंत आहेत, मग हे लोक मध्यांच्या बाबतींत कसा विश्वास ठेवणार? सीतेच्या जन्ममृत्यूंवर आपला विश्वासच नाहीं, त्यामुळें तिच्या मधल्या जीवनावर आपला विश्वास बसत नाहीं, तें जीवन विश्वनीय असें वाटत नाहीं.

जोंपर्यंत सत्य आहे तोंपर्यंत रामायण आहे आणि जोंपर्यंत रामायण आहे तोंपर्यंत सीताही आहे. स्वर्गांतील कोमल पुष्प जगाला सुगंधित करून नाहींसें झालें. जीवनपुष्प सुगंध दरवळून निघून गेलें. अधःपतित मानव त्याची कदर करूं शकणार नाहीं! कोमल पुष्प स्वतःचें कार्य पुरें करून अदृश्य झालें, परंतु अजूनही त्याचा सुगंध लोकांना मिळत आहे आणि हजारों वर्षांपर्यंत तो मिळत राहाणार.

सीता गेल्यानंतर रामाच्या डोळ्यांतून अश्रूंचे पूर वाहूं लागले. अयोध्यावासी लोकांत तिची निष्कलंकितता सिद्ध झाली, परंतु ती दिव्य सीता मर्यादापुरुषोत्तम रामाला परत मिळाली नाहीं. तिचें बलिदान हा अमर आणि दिव्य करुण प्रसंग आहे. डोळे अश्रूंनीं भरून यावेत असा हा प्रसंग आहे. लोक त्यामुळें त्याला ‘शोकांतिक, Tragedy’ असें म्हणतात. मी असें म्हणतों कीं, “जशी दिव्य सुरवात तसा दिव्य अंतहि आहे.” जिच्यासाठीं सिंहासन आलें तिचा मृत्यु दिव्यच होय. त्यामुळें जिचा जन्म लोकोत्तर, जीवन लोकोत्तर, तिचें इथून महाप्रयाण सुद्धां लोकोत्तरच आहे.

हें पुष्प बोलतां बोलतां आलें, जगाला मार्गदर्शन केलें, जगाला गुण दाखविले आणि निघून गेलें. या सीतारूपी पुष्पामुळेंच रामायणाचें महत्त्व वाढलें आहे. या दिव्य चरित्राची महत्ता ध्यानांत येण्यासाठीं वरवर केलेलें वाचन उपयोगी नाहीं. अशा तऱ्हेचें दिव्य आणि अलौकिक चरित्र दुसऱ्या कोणत्याहि ठिकाणीं वाचावयाला मिळणार नाहीं.



# श्रीरामनवमी उत्सव, शके १८८८

श्रीसच्चिदानंद सद्गुरू आधुनिक संतचुडामणी श्रीसाईबाबा महाराज मु. शिर्डी, ता. कोपरगांव जिल्हा अ. नगर यांचा श्रीरामनवमी उत्सव मि. चैत्र शु ८ दि. ३० मार्च १९६६ बुधवार रोजी प्रारंभ होऊन मिती चैत्र शु. १० दिनांक १ एप्रिल १९६६ शुक्रवार रोजी गोपाळकाल्याचें कीर्तन होऊन समाप्त झाला.

या उत्सवाकरितां मुंबई, पुणें, ठाणें, नाशिक, सोलापूर, नागपूर, वऱ्हाड, खानदेश, मध्यप्रांत, मद्रास, म्हैसूर, आँध्र व मराठवाड्यांतील नांदेड, परभणी, निझामाबाद वगैरे ठिकाणाहून बरेच भक्तलोक श्रीसाईंच्या दर्शनास आले होते.

श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी मार्फत उत्सवाकरितां मंदिर, द्वारकामाई चावडी यांना रंगसफेती करण्यात आली होती. उत्सवाकरितां मांडव, ध्वजापताका घालण्यांत आली होती. तसेंच विजेची रोषनाई करण्यांत आली होती.

उत्सवाचा मुख्य दिवस श्रीरामनवमी दि. ३१ मार्च गुरुवार या दिवशीं आल्यानें गर्दी फारच होती.

दि. ३० मार्च १९६६ रोजीं पहांटे ६ वाजतां श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक मंदिरांतून निघून गुरु–पादुकामार्गें श्रीद्वारकामाईत चांदीच्या भव्य मखरांत स्थापन करण्यांत आली. त्यानंतर नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त भक्तांच्या सामुदायिक पूजा व अभिषेक करण्यांत आले. तसेंच श्रींच्या कपड्यांची प्रसाद रूपानें विक्री करण्यांत आली. दुपारी ह. भ. प. तुकारामबुवा आजेगांवकर यांचें कीर्तन ४ ते ६ वाजेपर्यंत झालें. रात्रौ ९ ते ११ वाजेपर्यंत श्रींच्या पालखीची गांवांतून मिरवणूक झाली. भजन गारूड–भारूड, सुरसनई बँड वादन वगैरे गोष्टींनीं मिरवणुकीस शोभा आली होती.

दिनांक ३१ गुरुवार रोजीं नित्य कार्यक्रमाव्यतिरीक्त पहांटे ६ वाजतां श्रींच्या पोथीची व फोटोची मिरवणूक द्वारकामाईतून गुरुपादुकामार्गें श्री समाधी मंदिरांत आली. त्यानंतर कोपरगांवच्या गोदावरीच्या तीर्थांतून भक्तांनीं आणलेल्या कावडीची मिरवणूक होऊन त्यांचे माननीय कोर्ट रिसीव्हर श्री. भा. ग. पोतनीससाहेब यांचे हस्तें पूजन झालें. त्या श्रीसाईबाबांच्या समाधीवर घालण्यांत आल्या. कावडी अदमासे ५००–६०० होत्या. प्रत्येकांस श्री. अनंतराव आठवले यांनी एकेक श्रीफल प्रसाद म्हणून दिले. त्या दिवशीं अभिषेक, पुजन गर्दीमुळें सामुदायिक करण्यांत आल्या. १०॥ ते १२॥ पर्यंत श्री. ह. भ. प. अनंतराव आठवले यांचें श्रीरामजन्म कीर्तन मंदिरासमोर झालें. त्यानंतर आरती, तीर्थप्रसाद वांटण्यांत आला. दुपारीं श्री साईंच्या कपड्यांची प्रसादरूपानें विक्री करण्यांत आली. सायंकाळीं रथाची व निशाणाची मिरवणूक काढण्यांत आली. रात्रौ

९ ते १० नेहमींप्रमाणें गुरुवारची पालखीची मिरवणूक झाली. रात्रौ शेतांतील मोकळया जागेवर शोभेचें दारूकाम झालें. रात्रौ १० ते पहाटे ३ वाजेपर्यंत श्रींचें देऊळ भक्तांच्या दर्शनास खुलें ठेवून संगीत कलाकारांच्या गायनवादनाच्या हजेऱ्या झाल्या. प्रत्येक कलाकारांस श्री. साई संस्थान तर्फे १ रुपया व नारळ प्रसाद म्हणून देण्यांत आला. कलाकारांत मुंबईचे श्री स्नेहल भाटकर यांनीं सुंदर भजनें, गौळणी, भारुडें इ. गोड गळयानें गाऊन बैठकीस बराच रंग भरला. अशा हा कलाकारांचा कार्यक्रम ६ वाजेपर्यंत चालू होता.

दिनांक १ शुक्रवार या दिवशीं नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त भक्तांच्या सामुदायिक अभिषेक पूजा झाल्या. प्रसाद रूपानें कापडांची विक्री करण्यांत आली. १०॥ ते १२॥ पर्यंत. ह. भ. प. श्री० अनंतराव आठवले, पुणें यांचें गोपाळकाल्याचें कीर्तन, दहीहंडी, खेळ वगैरे होऊन दहीहंडी फोडून सर्वांना प्रसाद देण्यांत आला व उत्सव संपला.

या उत्सवांत पोलिस बंदोबस्त चांगला होता, आणि लोकांना पिण्याच्या पाण्याची सोय ठिकठिकाणीं करण्यांत आली होती. स्वच्छता व खाण्यापिण्याची सोय चांगली होती. संस्थानच्या नोकर, सेवेकऱ्यांना अल्पोपहार व चहा, तीन दिवस देण्यांत आला. एक दिवस मिष्टान्न भोजन संस्थान नोकरांना देण्यांत आलें. या उत्सवांत श्री संस्थानचे कोर्ट रिसीव्हर श्री. भा. म. पोतनीस व सर्व खाते-प्रमुख यांची देखरेख उत्तम होती. येणेंप्रमाणें या वर्षी श्रीरामनवमी उत्सव उत्तम प्रकारें पार पडला.

———

—तुमची चांगली वागणूकच तुम्हाला तुमच्या खऱ्या उन्नतीचा मार्ग दाखवील, आणि जीवनांत सुखशांती प्राप्त करून देईल.

—कृती करणें अत्यंत हिताचे आहे पण विचारांतूनच कृती करण्याची बुद्धी होते. यासाठी आपलें मन उच्च विचारांनी व उच्च ध्येयाने भारून घ्या. आपले ध्येय सतत डोळयां-पुढें ठेवा. म्हणजे त्यांतूनच महान कृत्ये करण्याचे सामर्थ्य तुम्हांस प्राप्त होईल.

—सुखी आणि हितकारक जीवन प्राप्त करून घेण्यासाठीं सतत झटत राहणे हेंच जीवंतपणाचे खरे लक्षण होय.

—माझ्या शूर तरुणानो महान कृत्ये करण्यासाठीच तुम्ही जन्माला आला ही दृढ श्रद्धा धरा. कुत्र्यांचे भुंकणेच काय पण आकाशांतील वज्र-गर्जनाही तुम्हाला घाबरवू शकणार नाही इतके धैर्याने उभे रहा व आपले कर्तव्य धीटपणे करीत रहा.

☆

—साईसदन ( दादर, डॉ. आंबेडकर रोड ) येथें प्रतिवर्षाप्रमाणें यंदाही रामनवमी उत्सव उत्तमप्रकारे पार पडला. हनुमानसमर्थ भजन मंडळीचे सुश्राव्य भजन दुपारीं ११ ते १ वाजेपर्यंत झाले.




## मार्च १९६६

या महिन्यांत भक्तांची गर्दी शिर्डीस नेहमींप्रमाणें होती. शिवाय श्री रामनवमी उत्सवामुळें बरीच गर्दी होती. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली, ती खालीलप्रमाणें.

**कीर्तन**

श्री. ह. भ. प. आबा पणशीकर, मुंबई. श्रीमती कृष्णाबाई येवलेकर, सातारा. श्री. ह. भ. प. वासुदेव महादेव म्हसकर, वज्रेश्वरी–गणेशपुरी. जि. ठाणा–श्री. ह. भ. प. वसंत राधाकृष्ण पंडित मु. शेंदुर्णी ( पू. खा.) श्री. ह. भ. प. तुकारामबुवा आजेगांवकर, श्री. ह. भ. प. अनंतराव आठवले, पुणें. संस्थान गवई विठलराव मराठे यांचीं कीर्तनें नेहमीप्रमाणें.

**गायन**

श्री. स्नेहल भाटकर, मुंबई, सौ. आशा विजय मस्तकार, मुंबई, कुमारी लिला बंगारू, नांदेड ( मराठवाडा ), श्री. अनंत नारायण लाड, मुंबई,. श्री. शंकरदास प्रेमी हैद्राबाद. ( डे. ) श्री. राजेश्वर देशमुख, अमरावती.

**व्हायोलिन्वादन**

श्री. दत्तात्रय रामचंद्र माणगांवकर, मुंबई. श्री. नरेंद्र गणपतराव देवसकर, मुंबई.

**तबलावादन**

श्री. नरसू शिवराम भावे, वरळी कोळीवाडा, मुंबई.

**भजनी मंडळें**

कोपरगांव महिला भजनी मंडळ व गोवर्धन भजनी मंडळ, धर्मजागृति भजनी मंडळ, वसई, जि. ठाणें, साई भवानी प्रासादिक भजनी मंडळ, कैवल्य आश्रम, विलेपारले, मुंबई. राजनूबाबू दौंडकर कव्वाली भजनी मंडळ पार्टी ( दौंड )

**मोठ्यांच्या भेटी**

श्रीमती सुमित्राराजे भोसले महाराणी सातारा. श्री. घाई असि. पोलिस कमिशनर, मुंबई, श्री. नायर, मेजर, मुंबई.

शिरडी येथील हवापाणी–उन्हाळा बराच आहे.

———

## Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ८-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ४-०० |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality**- | | by Pradhan | १-०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** | (Telgu) | | १-०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) | साईबाबा-अवतार व कार्य | (मराठी) | श्री. घोंड | २-०० |
| (१०) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (११) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१२) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१४) | श्री साई-सुमनांजली | (मराठी १०८ नांवें) | | ००-०६ |
| (१५) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१६) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१७) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (१८) | **Guide to Shirdi** | (English) | | ००-१२ |
| (१९) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००-२० |

### Colour pictures of Sai Baba by Neroy

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone $9\frac{1}{2}" \times 13\frac{1}{2}"$ medium | **00-37** |
| (2) | ,, ,, in Dwarkamai $9\frac{1}{2}" \times 13\frac{1}{2}"$ medium | **00-50** |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 50 nP. for No. 1 Postage Extra ( minimum purchase of Rs. 15 ). *Can be had from* (मागवा) :

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मालक : **श्री साईबाबा संस्थान, शिरडी,** आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां